साप्ताहिक

# माणूस

## चित्रवार्ता पुस्तक पुरवणीसह

वीस सप्टेंबर ● एक रूपया


झोपडपट्टी निर्मूलनासाठी खास प्राधिकरण स्थापन करण्याची म. शासनाची योजना स्वागतार्ह आहे.






पण
शहरात
गर्दी
करणारा
हा
मध्यमवर्ग
व
कामगारवर्ग..





…खेड्यापाड्यात
गुंतवल्याशिवाय
झोपडपट्ट्यांचे
निर्मूलन
होणे
शक्य
नाही.



# यासाठी शिक्षणात क्रांती हवी.

साप्ताहिक

माणूस

वर्ष : पंधरावे – अंक सोळावा

२० सप्टेंबर १९७५

मूल्य : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी
छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी
वीस रुपये
परदेशची वर्गणी
पंचावन्न रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
दूरध्वनी : ४३४५१

छायाचित्र मांडणी : मुनिल कुरणे

# वर्धापनदिन : ग्राहक-चळवळीचा

**मुक्काम पुणे । प्रकाश जोशी**

☐ ' ग्राहकः एव राजा ' अशी अक्षरं व्यासपीठावर दिमाखानं आढळतात.

ग्राहकपंचायतीच्या जनता ग्राहक चळवळीचा वर्धापनदिन हुजुरपागेच्या सुरेख पटांगणात साजरा करण्यात येतो. (६ सप्टेंबर) समारंभाचे अध्यक्ष पु. ल. देशपांडे व ग्राहकपंचायतीच्या शाखांचे प्रमुख समईतील ज्योती उजळून समारंभाची सुरुवात करण्यात येते.

आम्ही हे केलं आम्ही ते केलं अशी टिमकी मिरविण्याचा हा समारंभ नाही असं ग्राहकपंचायतीचे अध्यक्ष बिंदु माधव जोशी प्रथमच स्पष्ट करतात. श्रीफलाच्या विक्रीपासून सुरुवात करून वर्धापनदिनी श्रीफल देऊन पूर्ण झालेला हा श्रीफल ते श्रीफल प्रवास. त्याचं मूल्यमापन थोडंसं मागं वळून कुठपर्यंत चालून आलो त्याचा अंदाज घ्यायचा व पुढील पाऊल टाकायचे. त्यापूर्वी थोरामोठ्यांचे चार धीराचे, चार मार्गदर्शनाचे शब्द ऐकायला मिळावे हा या समारंभाचा हेतु. ऑपरेशन लक्ष्मीरोडसारखी अनेक आंदोलने जमेच्या बाजूला आहेत. त्यापेक्षा विधायक पर्याय शोधून ते अंमलात आणल्याचं समाधान, उदाहरणार्थ लाखो वह्यांची रास्त भावात विक्री. ही ग्राहक-चळवळ कशासाठी ? तर आर्थिक परिवर्तनाच्या प्रक्रियेतील एक आवश्यक अंग म्हणून.

ग्राहक-चळवळ ही बरीचशी सहकारी चळवळीच्या पावलावर पाऊल टाकणारी. थोडी वेगळ्या परिस्थितीत व वेगळ्या उद्दिष्टाने साकारलेली; पण तत्त्व एकच. असंघटित, कमकुवत घटकांना एकत्र आणणे. सहकारी चळवळीचे एक जाणकार नेते नागरी पुरवठा मंत्री रत्नाप्पा कुंभार स्वतःहून समारंभाला हजर राहतात. कोणत्याही मानपानाची अपेक्षा न करता. आमंत्रण-निमंत्रणाची वाट न पाहता. या अभिनव चळवळीचे जवळून निरीक्षण करण्यासाठी. सहकारी चळवळीतील अनुभवाच्या आधारावर रत्नाप्पा कुंभार ग्राहक-पंचायतीच्या कार्याबद्दल आपले विचार मांडतात. लाखो रुपयांचे व्यवहार अतिशय स्वच्छपणे केल्याबद्दल प्रथमच ते समाधान व्यक्त करतात. त्यानंतर एखाद्या मुरब्बी प्राध्यापकाच्या स्टाईलीत जीवनावश्यक वस्तू, त्यांचे उत्पादन, त्यांची वितरण व वाटपव्यवस्था, त्यात सरकारचे कर्तव्य, समाजाचा सहभाग व सर्वात शेवटी लोकशाही समाजवादी अर्थव्यवस्थेतील ग्राहकाची भूमिका याबाबत सविस्तर निरूपण करतात.

उत्पादन झाल्यावर तिचे समाजाच्या सर्व थरांत समान तत्त्वावर वाटप होणे आवश्यक असते; परंतु त्यात व्हेस्टेड इंटरेस्ट निर्माण झाले की असमानता येते. वस्तूंच्या किंमतीत भरमसाठ वाढ व भेसळ ही व्हेस्टेड इंटरेस्टमुळे निर्माण होते. त्यामुळे उत्पादन व वितरणातील ' मिडलमन ' जो आहे तो आपल्याला काढावा लागणार आहे. शक्यतो अशा गोष्टी ग्राहक-पंचायतीसारख्या चळवळीतून व्हाव्यात अशी अपेक्षा आहे; पण या प्रक्रियेची मंद गती पाहिली असता हे मिडिलमन, मध्यस्थ काढण्यासाठी आम्ही कायद्याचा वापर करण्यासही मागेपुढे पाहणार नाही. अर्थात त्या वेळी जनतेचा पूर्ण सहभाग व सर्व प्रकारचे सहकार्य हेही लागणार आहे. जोपर्यंत हे मिडिलमन आहेत तोपर्यंत आपली लोकशाही समाजवादी समाजरचनाही अपूर्णच राहील. त्यामुळे समाजालाच मध्यस्थाची भूमिका सहकारी तत्त्वाचे आचरण करून स्वीकारावी लागणार आहे.

चोख व्यवहाराबद्दल रत्नाप्पा समाधान व्यक्त करतात; पण अशा प्रकारे लाखोंचे व्यवहार करताना ' लीगल सँक्शन ' आवश्यक असल्याचं स्पष्टपणे सुचवितात. वस्तूंच्या वाटपाप्रमाणे जिथे शक्य होईल तिथे ग्राहक-

पंचायतीने उत्पादनच वाढविले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त करतात.

भाषण बरंच लांबलेलं. तासन् तास भाषणे ऐकण्याची सवय नसलेले व शहरी श्रोते. बिंदु माधव जोशी घड्याळाकडे बघताहेत हे लक्षात येऊन रत्नाप्पा त्याचा उल्लेख करून भाषण आटोपतं घेतात. त्यापूर्वी 'साहित्यराजा' पु. ल. यांची अनुमती घेऊन कृष्णाची एक कथा सांगून कोणत्याही गोष्टीमागची भावना ही महत्त्वाची असते, तेव्हा ग्राहक-चळवळीतील मानवतेची भावना जपली पाहिजे असे तळमळीने सांगतात. वेळ बराच झालेला असतो; पण श्रोत्यांनी पेशन्स गमविल्याचे टाळ्या वाजवून व्यक्त केले नसते तरी चालले असते.

या समारंभाचे अध्यक्ष म्हणून आपण चांगलं गिऱ्हाईक गाठलं आहात. या पु. लं. च्या वाक्यावर वातावरण खुलतं. कारण माझ्यासारखी असंख्य गिऱ्हाइकं असून त्यांना आपल्या ग्राहक-पंचायतीची अतिशय आवश्यकता आहे. कारण आजपर्यंत आम्हाला अनेकांकडून व्यवहारात फसविण्यात आलेले आहे; पण एकएकटे आम्ही काय करणार ? त्यामुळे श्रीफल ते श्रीफल प्रवास पूर्ण करणाऱ्या या ग्राहक-पंचायतीस मी सुयश चिंततो.

एक तरी प्रश्न, एक तरी आघाडी अशी असावी की जेथे सर्व पक्षांचे एक मत व्हावे आणि 'अन्न' ही आघाडी अशी आहे की जेथे सर्व प्रकारच्या विचारसरणीचे, पक्षांचे एकमत व्हावे. आपल्या ग्राहक-पंचायतीत मला सर्व प्रकारची सर्व पक्षांची माणसं एकत्र काम करताना दिसली म्हणूनच या चळवळीविषयी मला आत्मीयता वाटली.

आपला देश अतिशय समृद्ध आहे; पण लोक अतिशय गरीब आहेत. आपला समाज अर्धपोटी आहे. जोपर्यंत समाज अर्धपोटी आहे तोपर्यंत समाज, त्या समाजातील विचारवंत हे निर्भय बनूच शकत नाहीत. कलाकार कसदार निर्मिती करू शकत नाही. कसं जगायचं हे आपलं आपणच ठरवलं पाहिजे. प्रत्येक गोष्टीत सरकारवर अवलंबून राहता येणार नाही. आपल्या परिस्थितीकडे डोळे उघडून पहावं ही शिकवण या ग्राहक-चळवळीनं आपल्याला दिली आहे ही अतिशय महत्त्वाची मूलभूत कामगिरी ग्राहक-पंचायतीने केली आहे असं मी मानतो.

नीतिमूल्ये श्रमप्रतिष्ठा व विश्वस्त भावना या ग्राहक-चळवळीच्या मूलभूत पायामुळे 'केवळ नफा' हे समाजाच्या वर्गाचे ध्येय मोडून काढण्याची सुरुवात झाली आहे. श्रमाला प्रतिष्ठा देणाऱ्या ह्या चळवळीमुळे ग्रामीण व शहरी जनतेत नवे भावनिक नाते निर्माण करण्याचे कार्य निर्माण होऊ शकेल.

ही चळवळ केवळ एका वर्गापुरती एका, भागापुरती मर्यादित राहून चालणार नाही. मी पुणे शहराचे पूर्व-पश्चिम असे भाग मनात ठेवून बोलत नाही; परंतु ही चळवळ समाजातील गरीब व नाडलेल्या लोकांपर्यंत पोहोचली पाहिजे. निरनिराळ्या शहरांत, खेड्यांत तिच्या शाखा सुरू व्हायला पाहिजेत. पुढच्या वर्षी आपण जेव्हा जमू त्या वेळी इतक्या शाखा निर्माण झाल्या पाहिजेत की हो समईच नव्हे तर आजूबाजूची झाडेसुद्धा दिवे उजळण्यास अपुरी पडतील.

ग्राहकमार्ग या विशेषांकाचे प्रकाशन झाले. किंचित लांबलेला परंतु बराच काळ लक्षात राहील असा समारंभ संपल्यावर थबकलेला पाऊस झिमझिम बरसू लागला. ◻


या आनंदयात्रेत जे पाहिलं त्याची ओझरती टिपणं म्हणजे हा लेखसंग्रह. रूढ अर्थानं ही प्रवासवर्णनं नाहीत. माणसं, त्यांची गुदमरलेली आणि फुललेली प्रवाही मनं, अखंड पालवणारं ऋतुचक्र आणि वज्रलेप नियती ह्यांच्या नातेसंबंधांची गुंफण माझ्या नजरेत कशी झाली, त्याचा हा विलक्षण घाईगर्दीत उरकलेला आलेख आहे.

**आनंदाच्या दाही दिशा**

**रवींद्र पिंगे**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

**किंमत : दहा रुपये**


## कष्टाची भाकर

◻ 'कष्टाची भाकरी' ही केव्हाही गोडच लागते; पण आजच्या महागाईच्या काळात दिवसभर राबराबून मिळविलेल्या मजुरीत दोन वेळेची भाकरी मिळणेही जवळजवळ अशक्य झाले आहे. घाम गाळणाऱ्या कष्टकऱ्याला तर पोळीपेक्षा भाकरीच जवळची. त्यांची ही गरज लक्षात घेऊन मागील वर्षीच हमाल पंचायतीने 'कष्टाची भाकर' योजना 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर सुरू केली आहे. तिचा अनुभव व वाढती मागणी लक्षात घेऊन कष्टाच्या भाकरीसाठी सुसज्ज स्वयंपाकघर रास्तापेठेत बांधण्यात आले असून त्याचे उद्घाटन नुकतेच झाले. दहा हजार लोकांना दोन वेळ जेवण पुरविण्याची क्षमता या स्वयंपाकघरात आहे. 'कष्टाची भाकर' योजनेत भाकरी, चपाती, भाजी व शिरा यांचे वाटप करण्यात येते. किंमत कमी असली तरी मालाचा दर्जा चांगला व प्रमाण भरपूर असते. नाही तर बाहेर हॉटेलात उलटा अनुभव येतो. एक तर किंमती वाढवून त्या कमी केल्या जातात, नाही तर किंमती कमी झाल्या की त्या प्रमाणात पदार्थाचे प्रमाणही कमी होते. चहाचा कपही कमीअधिक प्रमाणात भरला जातो; परंतु ना नफा ना तोटा या या तत्त्वावर चालविण्यात आलेल्या या योजनेत भाकरी १५० ग्रॅम व शिरा २०० ग्रॅम असे प्रमाण निश्चित केले आहे.

त्यामुळे दिवसभर कष्ट करून 'कष्टाची भाकरी' मिळावी म्हणून या केंद्राकडे वळणाऱ्यांची संख्या वाढतच आहे.

◻

# सहकारी कर्जपुरवठा स्वस्त कसा होईल?

## महाराष्ट्र सहकारी बँकेची दलाली थांबवा!

प्रा. देवदत्त तुंगार

पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी घोषित केलेल्या क्रांतिकारक आर्थिक धोरणाच्या दिशेने परिणामकारक उपाययोजना सुरू झालेली दिसत असून समाजातील कमकुवत वर्गांच्या दृष्टीने ही स्वागतार्ह घटना आहे. गरीब शेतकरी आणि कारागीर यांची कर्जमाफी व्हावी यासाठी अध्यादेशही निघाला आहे. कर्जमाफी करणे आवश्यक व अपरिहार्य होतेच; पण लोकसत्ताकारांनी म्हटल्याप्रमाणे कर्जमाफी झाली. कर्जपुरवठ्याचे काय? हा प्रश्न आता उद्भवतो. ग्रामीण भागात अद्यापही सावकारी पाश आहेच व स्वस्त आणि पुरेशा प्रमाणात वेळेवर सहकारी संस्थांकडून कर्जपुरवठा झाल्याशिवाय सावकारी पाश शिथिल होणार नाही.

### मध्यस्थी संपवा

रिझर्व्ह बँक महाराष्ट्र सहकारी बँकेमार्फत जिल्हा सहकारी बँकांना नऊ टक्के व्याजाच्या दराने कर्जपुरवठा करते. या नऊ टक्क्यांपैकी अर्धा टक्का व्याज महाराष्ट्र सहकारी बँकेला मिळते. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका अल्पमुदत जिरायती शेतीसाठी दहा टक्के दराने व बागायतीसाठी ११ टक्के दराने कर्ज देते. ग्रामीण शेतीपतपुरवठा सोसायटया सभासदाकडून त्यावर जास्तीत जास्त तीन टक्के व्याज घेऊ शकतात. रिझर्व्ह बँक जिल्हा सहकारी बँकांना नियमांची पूर्तता केल्यावरच कर्ज देते. नियमांची पूर्तता होत नसेल तर महाराष्ट्र सहकारी बँक रिझर्व्ह बँकेकडून जिल्हा सहकारी बँकांना कर्ज मिळवून देत नाही, देऊ शकत नाही. मग केवळ कागदपत्र पोचविण्याच्या पोस्टमनच्या कामासाठी अर्धा टक्का व्याज कशासाठी द्यायचे? सहकारक्षेत्रातील काही कार्यकर्त्यांचे त्यामुळेच असे म्हणणे आहे की रिझर्व्ह बँक व जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँका यांचा डायरेक्ट संबंध जोडल्यास जिल्हा बँकांना अर्धा टक्का कमी व्याजाने रिझर्व्ह बँकेकडून कर्ज मिळू शकेल व शेतकऱ्यांचा फायदा होईल. भुसावळ तालुका कृषि समस्या निवारण समितीचे अध्यक्ष श्री. हरिभाऊ जवरे यांनी व इतरांनी ही मागणी केली आहे. त्याबाबत सहकारी क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींनी सहानुभूतीपूर्वक विचार करणे अगत्याचे आहे. जिल्हा सहकारी बँकेची बेस लेव्हल (base level) रिझर्व्ह बँकेने साडेतीन कोटी रुपयांची ठरविली असून तेवढ्या रकमेवर साडेसात टक्के व्याजाचा दर आकारला जातो म्हणजेच दीड टक्का रिबेट मिळते. हा दीड टक्का आणि महाराष्ट्र सहकारी बँकेची मध्यस्थी संपविल्यास अर्धा टक्का असा एकूण व्याजाचा दर दोन टक्क्यांनी कमी करता येणे शक्य आहे.

### सदोष सहकार

सहकारी चळवळ धनिक, गर्भश्रीमंत व बागायतदार शेतकऱ्यांच्या वर्चस्वाखाली असून दुर्बळ घटकांच्या विकासाच्या ध्येयापासून ती दूर जात आहे अशी टीका करण्यात येते. गावडे समितीच्या अहवालाच्या अनुरोधाने प्रा. महाजन यांनी लोकसत्तेतील लेखात सहकारी चळवळीच्या दोषस्थळावर नेमके बोट ठेवले आहे व विधानसभेच्या अंदाजसमितीनेही सहकारी चळवळीच्या सदोष 'स्वरूपावर प्रकाश टाकला आहे. नामदार यशवंतराव मोहिते यांच्यासारख्या अभ्यासू मंत्र्याने कमी व्याजाच्या दराने विशेषत: जिरायती शेतकऱ्यांना कर्जपुरवठा सहकारी चळवळीच्या माध्यमाने कसा उपलब्ध होईल याचा विचार करून महाराष्ट्र सहकारी बँकेची मध्यस्थी संपविण्याच्या पर्यायाचा फेरविचार केला पाहिजे.

सहकारी चळवळ जीवनाच्या विविध अंगांना स्पर्श करीत असली तरी आजही तिचे मुख्य स्वरूप कर्जपुरवठायंत्रणेचेच दिसते. ग्रामीण शेती पतपुरवठा संस्था कार्यक्षम करून तिला प्रभावी बनविले पाहिजे. जिल्हा बँकेचा व तिचा संबंध धनको–ऋणको असा न समजता पितापुत्रसंबंध समजून शेती पतपुरवठा संस्था सामर्थ्यवान बनविल्या पाहिजेत. जिल्हा बँकांनी या सोसायटयांना अल्पमुदत कर्ज साडेआठ टक्क्यांनी दिले पाहिजे. जिल्हा बँकांना थोडा फायदा कमी झाला व शेती पतपुरवठा सोसायटया त्यामुळे अधिक बलवान होत असल्या तरी त्याचे वैषम्य किंवा दुःख वाटण्याचे कारण नाही.

भारतातील सुमारे ६३ टक्के ग्रामीण जनता कर्जबाजारी आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात खासगी सावकारांचे कर्ज ५५ कोटी रुपयांच्या आसपास असून राज्यपाल डॉ. अलियावर जंग यांनी नुकत्याच काढलेल्या कर्जमाफीच्या वटहुकुमामुळे या कर्जाचा अर्धा बोजा कमी होण्यास मदत होईल अशी अपेक्षा आहे.

### कर्जाचा वापर

शेतकऱ्यावरील कर्जाचा बोजा कमी करणे आवश्यक होतेच व त्या दिशेने प्रयत्न चालू आहेत ही स्वागतार्ह घटना असली तरी त्यामुळे कर्जबाजारीपणाचा प्रश्न सुटणार नाही. भावी काळात कर्जाचा बोजा निर्माण होऊ नये यासाठी खबरदारी घेतली पाहिजे. कर्ज उत्पादक कामासाठीच वापरले गेले पाहिजे व ज्या कामासाठी कर्ज दिले त्यासाठीच ते खर्च झाले की नाही हे पहाण्यासाठी कार्यक्षम व सचोटीची यंत्रणा हवी. राजस्थानात घेतलेल्या कर्जापैकी ४० टक्के कर्ज विवाहावर खर्च होतात, असे दिसून आले आहे. चुकीच्या सामाजिक रुढी आणि अनिष्ट प्रथा यांनी जखडलेला समाज त्यापासून मुक्त केला पाहिजे. कर्जात खितपत पडलेला समाज पुष्कळदा विविध व्यसनांच्या आधीन गेलेला दिसतो. व्यसनापायी होणारे कर्ज, उत्पादक कामासाठी मिळालेल्या कर्जापैकी व्यसनावर खर्च होणारी रक्कम याचाही विचार केला पाहिजे. अनुत्पादक कामावर खर्च होणारा पैसा फार मोठा आहे, त्यावर कायदेशीर बंधने घालणे पुरेसे नसून सरकारच्या मदतीला सामाजिक कार्यकर्त्यांनी याबाबतीत आले पाहिजे.

भारतीय शेतकरी कर्जात जन्मतो, कर्जात वाढतो व कर्जाचा वारसा ठेवून कर्जातच मरतो ही दुःखदायक परिस्थिती पालटली पाहिजे. सरकारी कडक निर्बंधाला सामाजिक कर्तव्यबुद्धीची आणि शिस्तीची जोड दिली पाहिजे. देशभरच्या आणीबाणीच्या परिस्थितीमुळे अनुशासनपर्व सुरू झाले आहे. वातावरण अनुकूल दिसत आहे. लोखंड तापलेले असतानाच इष्ट आकार देणे शक्य असते. काही कटु पण अंती हितकारक असे निर्णय व शिस्तीचे उपाय अशा वेळी प्रसंगी अप्रियता स्वीकारून समाजसेवकांनी योजले पाहिजेत, हे काळाचे आव्हान आहे. ते आपण स्वीकारणार काय? हाच खरा प्रश्न आहे. ☐

# इस्लामिक संस्कृती परिचय लेखमाला

## लेखांक तीन । इस्लाम आणि स्त्री

रझिया वझिफ्दार

सांस्कृतिक वाटचाल, त्यामागचे तत्त्वज्ञान ह्यांचा मागोवा घेताना, त्या संस्कृतीत, तत्त्वज्ञानात, स्त्रीला काय स्थान आहे, ह्यालाही अतिशय महत्त्व आहे. संस्कृती पसरविण्याचे, फुलविण्याचे काम तत्त्वज्ञ करीत असले तरी, त्या त्या समाजाने अवलंबिलेल्या संस्कृतीचे, विचारसरणीचे बाळकडू मुलांना मातेकडूनच मिळते. स्त्रीला त्या त्या समाजात मिळणाऱ्या वागणुकीचे प्रतिबिंब, साहजिकच ती देत असलेल्या शिकवणुकीवर प्रभाव पाडीत असते. ह्या दृष्टीने कुठल्याही धर्मात स्त्रीला जे स्थान मिळते, त्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कवी पुरातन काळापासून अतिशय हळुवारपणे स्त्री रंगवत आला आहे. अगदी प्राचीन किंवा अश्मयुगीन काळापासूनदेखील ! अश्मयुगीन काळात मुळात मानवप्राणीच काहीसे जनावरसदृश जीवन जगत होता. स्त्री ही त्याने त्या काळी कमीच लेखली. काही अंशी एक खालच्या दर्जाचा उपभोग्य प्राणी ह्याच नात्याने ! माणूस जसजसा प्रगत होऊ लागला, तसतशी माणसाची 'स्त्री'कडे पाहण्याची प्रवृत्ती बदलू लागली. जीवन-नाटचातला महत्त्वाचा भागीदार म्हणून तिच्याकडे पाहिले जाऊ लागले. विवाहसंस्था अस्तित्वात आली. 'स्त्री' ही केवळ उपभोग्य वस्तू राहिली नाही, तर विवाहाच्या करारांनी तिच्या जीवनाला अधिक गंभीर अर्थ प्राप्त होत गेला ! प्रगतीची ही वाटचाल इतकी लक्षणीय ठरली आहे की, आज जवळजवळ सर्व प्रगत जगात स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीने अधिकार प्राप्त झाले आहेत. पुरुषांइतकाच मान आज तिला मिळत आहे. इतकेच काय, पण काही ठिकाणी स्वकर्तृत्वावर तिने पुरुषांवर श्रेष्ठत्वही प्रस्थापित केले आहे.

स्त्रीच्या ह्या आजच्या प्रगतीत त्या त्या ठिकाणच्या संस्कृतींचा वाटा फार मोठा आहे. स्त्रीला मानाने वागवायचे आदेश वेळोवेळी प्रत्येक धार्मिक संस्थेच्या उलेमांनी दिलेले आहेत. हे आदेश व प्रेषित, प्रचारक आदींनी घालून दिलेल्या आदर्शानुसार स्त्रीला वेळोवेळी नवनवे अधिकार मिळत गेले. त्यातूनच ज्या 'स्त्री'च्या वाटचाला एके काळी अतिशय तुच्छतेचे जीवन येत असे, गुलामगिरीशिवाय दुसरे जिणे नसे, त्याच 'स्त्री'ला मानाचे पान हलकेहलके का होईना पण मिळत गेले. 'शादी'ला अर्थ असा कधी नव्हताच. मनात येईल तेव्हा हव्या तेवढ्या जनानांशी निका लावावा, हवा त्या वेळी त्यांना तलाक द्यावा–ह्या प्रकारांना काही ताळबंदच नव्हता. काही काही ठिकाणी बहुपत्नित्वाप्रमाणेच बहुपतित्वाचीही चालू होती आणि माझ्या मते बहुतेक सर्वच समाजांमध्ये असले रिवाज अस्तित्वात होते. जसजसा समाज पुढारत गेला, तसतसे हे जुने रूढी-रिवाज मागे पडत गेले. प्रेपितांसारख्यांनी नवे आदर्श पुढे मांडले. जुन्या चालीरीतींना पायबंद घातला !

इस्लामचा ह्या दृष्टीने विचार करताना विशेषतः ह्या देशात इस्लामवर होणाऱ्या टीकेने माझे मन खूपदा व्यथित होते. ह्या देशात पाळल्या जाणाऱ्या काही चालीरीतींमुळे (आणि अशा विवाद्य किंवा निंदनीय चालीरीती बहुतेक सर्वच समाजांमध्ये–ह्या देशातल्या अन्य धर्मीयांमध्येही–आजही रूढ आहेत !) इस्लामवर टीका करणाऱ्यांनी जर इस्लामचा अभ्यास केला, पवित्र कुराणाचे चिंतन केले तर मला वाटते, इस्लाममध्ये 'स्त्री'ला असलेल्या स्थानाविषयीचे त्यांचे विचार बदलू शकतील ! इस्लाममध्येही 'स्त्री'ला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. तिला सर्वच बाबींमध्ये पुरुषासमान अधिकार बहाल करण्यात आलेले आहेत, हेही त्यांना कळून येऊ शकेल ! ! एवढेच काय पण इस्लाममध्येही 'निका'च्या पावित्र्याला असामान्य महत्त्व असून बहुपत्नित्वाला व 'तलाक'ला इस्लामने वेळोवेळी विरोधच केल्याचे त्यांना आढळून येईल.

इस्लामपूर्व काळात अरबजगात स्त्रियांना अत्यंत हीन वागणूक मिळत असे. प्रेमगीते किंवा माणसाच्या वासना शमविण्याच्या घटका सोडल्या तर एरवी 'स्त्री'ला वागणूक मिळे ती अगदी खालच्या श्रेणीच्या जनावराचीच. बहुपत्नित्वाच्या चालीखेरीज त्या काळच्या अरबजगात तात्पुरत्या वैवाहिक करारांचीदेखील चाल होती. स्त्री जणू काही, मिळकत असल्याप्रमाणे तिची इतर इस्टेटीप्रमाणे वाटणी होत असे. वारसाहक्कानुसार संपत्तीची वाटणी व्हावी त्याप्रमाणे माणसाच्या मृत्यूनंतर त्याच्या बायकांचीही त्याच्या मुलांमध्ये, नातेवाइकांमध्ये वाटणी होत असे. सोयीनुसार निवडलेली पहिली पत्नी वगळली तर इतर सर्व बायकांना गुरांप्रमाणे रावावे लागायचे. ह्या क्रूर चालीरीतींमधून कित्येकदा आई-लेकामध्ये, विशेषतः सावत्र आई-मुलामध्ये संबंध प्रस्थापित व्हायचे. पुढे इस्लामच्या वाढीनंतर ह्या अनैतिक संबंधांना विरोध होऊ लागला. निकाह-उल्-मक्त (लज्जास्पद / किळसवाणे विवाह) म्हणून अशा संबंधांची वासलात लावली जाऊ लागली.

एकूण इस्लामपूर्वकाळात अरबजगात स्त्रीचे जिणे अत्यंत भयानक होते. कुठल्याही संपत्तीवर तिचा काडीमात्र अधिकार नसायचा. तिला तिच्या इच्छेनुसार लग्न करता येत नसे. उलट माणसाला हवे तेवढे निकाह लावता येत असत. वाटेल तेव्हा वाटेल त्या बायकोला क्षणात तलाक देता येत असे. एवढेच काय मुलीचा जन्मदेखील खपवून घेतला जात नसे. मुली जन्मताच त्यांना पुरून टाकायची

अत्यंत दुष्ट चालही तेव्हा अस्तित्वात होती. पवित्र कुराणात ह्या इस्लामपूर्वकाळाचे वर्णन आहे. 'स्त्री 'विषयी तेव्हा समाजभावना काय होती, ह्याचे वर्णन करताना कुराणाने म्हटले आहे, 'आपल्याला मुलगी झाल्याचे समजताच प्रथम त्याचा चेहरा एकदम काळा पडे, तर पुढच्याच क्षणी तो अत्यंत क्रोधित होऊन उठे...'

'इस्लाम 'ने अरबांमधल्या व आजूबाजूच्या ज्यू, ख्रिश्चन आदी समाजांमधल्या ह्या दुष्ट चालीरीतींना आळा घातला. स्त्रीला आपली जोडीदारीण, भागिदारीण म्हणून सन्मानाने वागवण्याची, तिचा योग्य तो मान राखण्याची शिकवण दिली. स्त्रीला समान वागणूक हे प्रेषित महंमदांनी स्वतःच्या शिकवणुकीचे एक महत्त्वाचे सूत्र मानले. पवित्र कुराणात देखील ह्या सूत्राला महत्त्वाचे स्थान मिळालेले आहे. 'समानतेच्या भूमिकेतून, स्त्रियांना देखील समान अधिकार असलेच पाहिजेत.' (२/२२८) अशा शब्दात कुराणांनी स्त्रियांना समानता बहाल केली आहे. प्रेषित महंमदांनी आपल्या निरोप–यात्रेच्या वेळी आपल्या भक्तांना–समाजाला उद्देशून म्हटले आहे......' हे माणसा, तुझ्या पत्नीबाबत तुला काही अधिकार जरूर आहेत; पण तसेच ते तुझ्याबाबत, तुझ्या पत्नीलाही आहेत ह्याचा विसर पडू देऊ नकोस. 'अल्लाह 'ने तुझ्या हाती विश्वस्त म्हणून ही वास्तू सोपवली आहे. 'विश्वस्त ' म्हणूनच तुझे हे कर्तव्य आहे की तू तुझ्या पत्नीला सन्माननीय, दयापूर्ण वागणूक द्यावीस......'

महंमदांनी व नंतर त्यांच्या शिष्यवरांनी, एकूण स्त्रीजातीच्या कल्याणालाच, उत्थापनाला उचलून धरले. महंमदांच्या कन्येला 'स्वर्गीय कन्या ' ( Lady of Paradise ) मानून त्यांनी एकूणच स्त्रीजातीला उच्च स्तरावर नेऊन बसवले. 'प्रकाशदेवता ' ( Our Lady of Light ) असे तिला संबोधून, स्त्रीत्वाला सर्वश्रेष्ठ बनवले. शुचिर्भूत आणि पावित्र्याचा एक आदर्शच तिने उभा केला. तिच्या पाठोपाठ आवेशानं महंमदांनंतर काही काळ 'इस्लाम 'च्या मार्गदर्शनाची सूत्रे सांभाळून ही परंपरा पुढे चालवली. सुप्रसिद्ध 'राबिया' व इतर हजारोंनी ती ज्योत पुढेही तेवत ठेवली.

महंमदांनी व खुद्द पवित्र कुराणांनीही, 'स्त्री 'च्या समानतेवर भर देण्यासाठी, परिच्छेदचे परिच्छेद ऊहापोह केलेला आहे. त्यातूनच स्त्रियांना पूर्वी नाकारण्यात आलेले अनेक अधिकार प्राप्त झाले. पुरुषांबरोबर समानतेच्या भूमिकेवर त्यांनीच स्त्रियांना उभे केले. आध्यात्मिक ज्ञान संपादण्याची दारेही स्त्रियांना पवित्र कुराणांनी उपलब्ध करुन अध्यात्म ( धर्म ) विषयक चर्चा, कायद्यांचा ऊहापोह ह्यामध्ये स्त्रीला पुरुषाबरोबर समसमान वाव इस्लामनेच दिलेला आहे. पुरुषांना स्त्रियांना कमी लेखण्याचा वा त्यांचा अपमान करण्याचा अधिकार नाही असे ठामपणे सांगून कुराणात पुढे म्हटले आहे, '......धर्मावर विश्वास ठेवणाऱ्या माणसा, त्यांना ( स्त्रियांना ) तू मान, तुझे श्रेष्ठत्व बाजूला ठेवून त्यांचेही म्हणणे ऐकून घे. तुझे शुद्धत्व, श्रेष्ठत्व त्यातूनच अधिक उजळून निघेल...अल्लाह सर्वज्ञात आहे एवढं लक्षात असू दे......' ( कुराण : १४।३० ) पुरुषांना असा सामंजस्याचा सल्ला देत असतानाच, स्त्रियांनाही विनयशीलतेचा, शालीनतेचाही सल्ला कुराणानं दिलेला आहे. अनैतिकतेला प्रोत्साहन मिळू नये म्हणून, स्त्रियांच्या डामडौल–अंगांगप्रदर्शनाला कुराणानं कडवा विरोध केलेला आहे. काही मर्यादेपलीकडे स्त्रियांनी आवश्यक तर बुरखाही पाळायला पवित्र कुराणाची हरकत नाही. ( कुराण १४।३१ )

कुराणातल्या ह्या वचनांचा आधार घेऊन, स्त्रियांवर इस्लामने मोठी बंधने लादली आहेत असाही प्रचार व्हायची शक्यता आहे; परंतु थोड्या खोलवर जाऊन विचार केल्यास असे आढळून येईल की, ही बंधने स्त्रीजातीला शाप नसून वरदानच आहेत. सामाजिक दृष्टया ह्या बंधनांचा नैतिक परिणाम फार महत्त्वाचा आहे. प्रेषितांच्या व नंतरच्या धर्ममार्तंडांच्या प्रयत्नांतून, आज स्त्रियांच्या सामाजिक दर्जात खूपच बदल घडला आहे. साहजिकच आजच्या युगात बुरख्याचा हट्ट कालबाह्य आहे यात वाद नाही; पण त्याचबरोबर, साधेपणा, शालीनता, दिमाख-दर्शनाला मज्जाव वगैरे बंधने आजही अत्यावश्यक आहेत असे मला वाटते. केवळ इस्लाममध्येच नाही तर इतर समाजांमध्येही ! स्त्रियांप्रमाणेच वैवाहिक संस्थेच्या संबंधात अशी बंधने पुरुषांवरही इस्लामने घातली आहेत व त्यातही विवाहसंस्थेचे आणि पर्यायाने एकूण समाजव्यवस्थेचेच रक्षण व्हावे हाच हेतू आहे. पुरुष आणि स्त्री ही दोघेही ह्या व्यवस्थेचे आधारस्तंभ. दोघांनीही परस्परांचे, अनैतिकतेविरुद्धचे रक्षणकर्ते म्हणून चोख भूमिका बजावाव्यात ही इस्लामची अपेक्षा आहे. 'जगातील मानवसृष्टीच्या मुळाशी केवळ माणूसच नाही तर स्त्रीही आहे.' ( कुराण ४९।१३ ); 'जन्मलेल्या मुलाचं / मुलीचं पालनपोषण ही केवळ पुरुषाचीच जबाबदारी नाही, तर तितकीच ती स्त्रीचीही आहे...' ( कुराण २।१२३ ); 'पुरुष तुमचा आधार आहेत; तर तितक्याच तुम्हीही ( स्त्रियाही ) पुरुषांचा आधार आहात.' (कुराण २४।३१) वगैरे कुराणातली वचनेही इस्लामच्या स्त्रियांकडे बघण्याच्या दृष्टिकोणाची आधार आहेत.

**या वर्षाच्या प्रवासवर्णनात 'आनंदाच्या दाही दिशा' हे पुस्तक सर्वोत्कृष्ट ठरेल यात शंका नाही.**

—शान्ता शेळके

ललित, सप्टेंबर १९७५

**आनंदाच्या दाही दिशा** — **मूल्य : १० रुपये**

**रवींद्र पिंगे** — **राजहंस प्रकाशन, पुणे ४११ ०३०**

ह्या साऱ्या संस्कृतिविवेचनात, स्त्रियांबरोबरच विवाहसंस्थेलाही अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. इस्लामपूर्वकाळात ह्या संस्थेला काही अर्थच नव्हता हे वर आलेच आहे. इस्लामने ह्या विवाहसंस्थेची ठीक डागडुजी करुन, तिची संपूर्ण नवीन घडण करुन. ह्या संस्थेला निश्चित असे भरीव स्वरूप दिले. बहुपत्नित्वाच्या चालीला इस्लामने उचलून धरले असा आरोप अनेकजण करतात; पण, माझ्या मते, अमर्याद बहुपत्नित्वाच्या रूढीला ठोकरून लावून, बहुपत्नित्वाला मर्यादाच इस्लामने घातल्या. जास्तीत जास्त व त्याही तशाच काही कारणासाठीच, चारच बायका करण्याचा परवाना देऊन, इस्लामने बहुपत्नित्वाला चांगलाच लगाम घातला. त्यातही आणखी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. ज्या चरणात, कुराणाने मुसलमानाला चार बायका करण्याचा परवाना दिला आहे त्याच्याच पुढच्या चरणात कुरणाने पुढील अटीही घातलेल्या आहेत. '...तुम्ही, दोन, तीन किंवा चार बायका करू शकता. चारपेक्षा कधीही जास्त नाही. तथापि त्या चारी वा एकीपेक्षा अधिक बायकांना संपूर्ण समान वागणूक वा न्याय देणे जर तुम्हाला तुमच्या आवाक्याबाहेरचे वाटत असेल, तर मात्र तुम्ही फक्त एकीशीच विवाह लावा!...' (कुराण; ४।३) समानतेचा अर्थ लावताना कुरणांनी केवळ कपडालत्ता, जेवण–खाण, राहाणी ह्यांच्यातल्याच समानतेवर समाधान मानलेले नाही; तर प्रेम–जिव्हाळा–सद्भाव–आदर ह्याही दृष्टीने सर्व बायकांना समान वागणूक मिळाली पाहिजे असाही आग्रह धरलेला आहे. सर्व बायकांना समान हक्क घरात मिळाले पाहिजेत, कर्तव्याची समप्रमाणात वाटणी झाली पाहिजे असाही संकेत कुराणांनी घालून दिलेला आहे. कपडालत्ता, जेवणखाण वगैरे बाबतीत सर्व पत्नींना समान वागणूक देता येणे शक्य असले तरी, माणसाच्या पत्नींविषयींच्या 'भावनां'चे वाटप, तेही समान वाटप, जवळजवळ अशक्यच आहे. हे लक्षात घेतले तर, असाच निष्कर्ष काढावा लागेल की कुरणाची व महंमदांचीही शिकवण, म्हणजे 'इस्लाम' बहुपत्नित्वाच्या चालीच्या विरुद्धच आहे! ह्या दृष्टीने पाहू गेले तर इस्लामिक कायदाही एकपत्नित्वाच्याच बाजूला कललेला आहे.

कुरणाच्या व महंमदांच्या शिकवणुकीचा हा विचार मांडला गेला की, महंमदांच्या जीवनावर बोट ठेवून, ह्या विचारावर टीका केली जाते. महंमद पैगंबरांना अकरा बायका होत्या हाच तो टीकेचा आधार. ह्याला उत्तर द्यायचे तर त्या वेळच्या परिस्थितीचा विचार केला पाहिजे. अनेक विद्वज्जनांचा असा आक्षेप आहे की, महंमदांनी इतरांना नाकारलेल्या अधिकाराचा स्वतः मात्र उपभोग घेतला. इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे ती ही की, महंमदांची ही बहुतेक सारी लग्ने, महंमदांनी जनतेला कुराण देण्यापूर्वी, महंमदांचे 'प्रेषित' पण त्यांच्याही लक्षात येण्यापूर्वी झालेली आहेत. सततच्या युद्धांमुळे, पुरुष आणि स्त्रिया ह्या परस्पर प्रमाणात त्या वेळी प्रचंड तफावत निर्माण झालेली होती. अनेक विवाहित पुरुष रणांगणांवर मारले गेले. अशातल्या काहींच्या विधवांशीही महंमदांनी लग्ने केली. विधवांच्या आयुष्यांचा पूर्वापार चालीरीतींप्रमाणे चुथडा होऊ न देता विधवांशी लग्न करुन महंमदांनी त्यांना एक प्रकारे अभयच दिले. अशाच पद्धतीने काही तलाक मिळालेल्या स्त्रियांशी महंमदांनी लग्न लावून त्यांनाही सामाजिक गर्तेपासून वाचवले. अशाच तऱ्हेच्या सामाजिक हिताच्या कारणांसाठी, महंमदांनी आपल्या शिष्यांनाही असे एकापेक्षा अधिक निकाह लावायला प्रोत्साहन दिले!

आणि अशाच दृष्टिकोणातून विचार करता, बहुपत्नित्वाला विरोध दर्शवीत असतानाही, इस्लामने बहुपत्नित्वाच्या चालीचा पूर्ण त्याग न करता, तिला फक्त मर्यादा घातल्या असाव्यात असे वाटते. कधीकधी सामाजिक गरजांमधून बहुपत्नित्व आवश्यक ठरूही शकत. समर्थनीयही! उपासमार, वेश्याव्यवसाय अशाच केवळ पर्यायांपासून जर एखाद्याच्या बहुपत्नित्वामुळे एखाद्या बाईला संरक्षण मिळत असेल तर, अशा बहुपत्नित्वाला विरोध असू नये असे वाटते. कुमारी माता, वा इतर अनैसर्गिक व अनैतिक संततीपेक्षा (War Babies or Natural Children) बहुपत्नित्व निश्चितच कुठल्याही समाजाची नैतिक पातळी अधिक वरच्या श्रेणीवर राखू शकते.

कदाचित ह्याच कारणांनी, कुराणांतून व हादितांमधून, मुस्लिमांना बहुपत्नित्व अजिबात टाळण्याचे आदेश दिले गेले नसावेत असे मला वाटते. 'गुलाम' पाळण्याची पद्धत आस्ते आस्ते समूळ उखडून टाकण्याचे आदेश 'अल्लाह'नी कुराणाद्वारे दिलेले आहेत. त्याविषयी मर्यादित बहुपत्नित्वाविरुद्ध मात्र असे कुठलेही आदेश कुराणात नाहीत आणि बहुपत्नित्वाची, क्वचित् प्रसंगी आढळून येणारी उपयुक्तता लक्षात घेऊनच त्या प्रथेला सर्वसाधारणपणे विरोध करूनही, कुराणांनी तिचा संपूर्ण धिक्कार मात्र कधीच केला नाही. मात्र त्याच वेळी, मर्यादित बहुपत्नित्वाची आवश्यकतेनुसार परवानगी देत असतानाच इस्लामनी अनैतिकतेशी कधीच तडजोड केली नाही. बहुपत्नित्वाचा पुरस्कार देखील नियम म्हणून नव्हे तर विशिष्ट परिस्थितीतली तडजोड ह्याच स्वरूपात इस्लामनं केला आहे. अशा पद्धतीने, इस्लामने खऱ्याखुऱ्या अर्थाने एकपत्नित्वाचाच हिरीरीने पुरस्कार केला असला तरी काही ठिकाणी अपवाद म्हणून व तेही सामाजिक हिताच्या दृष्टिकोणातूनच, बहुपत्नित्वाला परवानगी दिली आहे. मुस्लिम समाजावर, संस्कृतीवर टीका करताना, ह्या साऱ्याचा सखोल अभ्यास होत नाही ह्याचे वाईट वाटते. विशेषतः ज्या समाजामध्ये 'Polyandry' सारख्या चालीरीती पाळल्या जातात त्यांनी, स्वतःच्या डोळ्यातले मुसळ न काढता, दुसऱ्याच्या डोळ्यातले कुसळ शोधायचा प्रयत्न करावा हे काही पटत नाही! इस्लामचे ध्येय आहे जागतिक भगिनीत्वाने—Universal Sisterhood चे! प्रत्येक दुसरी स्त्री, माणसाने बहिणीप्रमाणे मानली पाहिजे. तिला बहिणीप्रमाणे वागणूक दिली पाहिजे! दुर्दैवाने पूर्व वा पश्चिम कुठल्याच जगतात, हे ध्येय दृष्टिपथात येईल इतपत 'स्त्री'ची परिस्थिती सुधारली आहे असे वाटत नाही! तशी ती सुधारेल तो दिवस, मुस्लिमच नव्हे तर सर्वच स्त्रीवर्गाचा मुक्तिदिन ठरेल! कुराणाच्या शिकवणुकीचे, महंमदांच्या व त्यांच्या शिष्यांच्या तपस्येचे चीज करणारा ठरेल!!

□ □

# सोलकढी

## □ क्रिकेटबद्दल नेहमीचेच

इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्या दरम्यानची चार कसोटी क्रिकेटसामन्यांची मालिका नुकतीच संपली. या मालिकेबद्दल लिहायचे असे आधीच ठरवले असल्यामुळे मला ही मालिका मोठी वैशिष्टचपूर्ण वाटली. काही स्वल्पदृष्टीची माणसे, एखादी गोष्ट वैशिष्टच-पूर्ण आहे, असे ठरल्याशिवाय तिच्याबद्दल लिहीत-बोलत नाहीत. त्यामुळे त्यांचे लिहिणे-बोलणे मचूळ होते; माझे होत नाही. असो.

या मालिकेतल्या पहिल्या कसोटीत ऑस्ट्रेलियाने इंग्लंडचे अगदी स्क्रॅम्बल्ड एग्ज ऑन टोस्ट केले. इतके की इंग्लंडच्या निवड-समितीने लगबगीने नवा उंची कर्णधार शोधला. त्याच्या उंचीचे बरोब्बर माप, २ ऑगस्ट १९७५ च्या 'सोलकढी' तल्या 'नवा कर्णधार : टोनी ग्रेग' या स्फुटात मी काढले होते. माप दाखवून श्राद्ध करायचे, अशी आपली माझी पद्धत आहे. दुसऱ्या कसोटीत, चौथ्या डावात, ऑस्ट्रेलियाला पाचशे मिनिटात ४८४ धावा करायचे निर्धोक आव्हान देऊन टोनी ग्रेगने आपण हरू नये याची वरी तरतूद केली. ग्रेग हरला नाही; पण जिंकला मुद्धा नाही. हरू नये म्हणून ओचेपदर सावरीत जे खेळतात ते सहसा जिंकत नाहीत. तिसरा कसोटी सामना, शेवटच्या दिवसापूर्वीपर्यंत, झकास अटीतटीचा झाला : इंग्लंडने पहिल्या डावात २२२ आणि दुसऱ्या डावात २९१ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाला पहिल्या डावात अवघ्या १३५ धावा करता आल्या. शेवटच्या दिवशी विजयासाठी ऑस्ट्रेलियाला २२५ धावा करायच्या होत्या आणि त्यांचे सात गडी शाबूत होते. चॅपेल-बंधू बाद झाले होते; पण मॅकॉस्कर ९५ धावा काढून खेळत होता. सामना कोण जिंकणार याबद्दल आम्ही पैजा मारल्या; परंतु होता त्याच अवस्थेत सामना सोडावा लागला. कारण काही कर्तबगार मंडळींनी शिस्तबद्ध तत्परतेने खेळपट्टीची विल्हेवाट लावून टाकली होती. जॉर्ज डेव्हिस नावाचा कैदेत पडलेला एक गुन्हेगार बेगुन्हा आहे असे मानणाऱ्या काहींनी ते कृत्य केले असावे असे सांगण्यात आले. जनतेचे लक्ष डेव्हिस-प्रकरणाकडे वळविण्यासाठी म्हणे त्यांनी हा जालीम उपाय योजला होता; इंग्लंडच्या पक्षपाती क्रीडारसिकांनी, इंग्लंड हरू नये म्हणून, ते कृत्य केले असण्याची शक्यता कोणी तरी बोलून दाखवली. तिच्यावर धापकन विश्वास ठेवणे मला फार्फार अवघड झाले. लोअशाहीच्या लोणच्यात मुरलेले क्रीडारसिक असे खवटतुरट काही कसे हो करतील, असे मला सुरुवातीला वाटले; परंतु आजकाल कोणाचा झाले तरी भलता भरवसा कसा देणार? मागे प्रेम आणि युद्ध या दोनच गोष्टी अशा होत्या की त्यात काय वाटेल ते चालायचे. अलीकडे त्यात खेळाची भर पडली आहे. खेळ प्रत्यक्ष न खेळणारी माणसे खेळात मक्रीय भाग घेऊ लागली आहेत : कधी खेळाचे नियम बदलायचे प्रतिभाशालित्व खेळाडू दाखवतात; कधी पंचमंडळी नियमापेक्षा आपल्या आवाजाचा कौल प्रमाण मानतात; कधी जागरूक प्रेक्षक सामान्याला वेगळे वळण लावतात; कधी क्रीडापटु-क्रीडारसिक यांच्यापलीकडचे एकूण वातावरण आपल्या लांब, अदृश्य हातांनी खेळाची दिशा निश्चित करतात. इंग्लंडची सध्या सर्वच बाबतीत होलपट चालू आहे. क्रिकेटसारख्या राष्ट्रीय खेळात तरी ती होऊ नये अशा उदात्त भावनेने काहीजण कार्यप्रवण झाले तर ते मला तरी समजू शकते. खानदानी कुत्र्यासारख्या सांभाळलेल्या माझ्या मनातसुद्धा अशी उदात्त भावना अनेक वेळा उसळी घेते : ती अजून बाहेर घमघमली नाही एवढेच.

चौथ्या कसोटी सामन्यात, हिंमत धरून, चिकाटीने खेळून इंग्लंडने पराभवाला हुलकावणी दिली. हा सामना संपल्याबरोबर इयान चॅपेलने स्वेच्छेने ऑस्ट्रेलियाचे कर्णधार-पद सोडून दिले. त्याबद्दल सगळेजण त्याचा जयजयकार करून राहिले आहेत. त्याचा मी धिकधिक्कार करतो. मला हा शुद्ध आचरटपणा वाटतो. त्याची कमाल अशी की कर्णधार-पद सोडून तो सर्फ निवृत्त होणार नाहीये. तो आपला अकरातला एक होऊन खेळणारच आहे. त्याला म्हणे कर्णधारपदाचे ओझे उतरवून मोकळेपणाने खेळायचे आहे. खेळ बापू खेळ. कांगारूला आपल्या पोटपिशवीचे ओझे झाले तर ते त्याने उतरवायलाच हवे. मला मात्र इयान चॅपेलच्या कर्णधारपदाच्या पोट-पिशवीत, त्याचा बंधू ग्रेग चॅपेल दिसतो. एरवी कर्णधारपद का कोणी सोडते ? त्याच्या ओझ्यामुळे खांद्यावर मोठ्या सुखद झिणझिण्या येत राहतात : त्यामुळे कर्णधार-पद मिळवण्यासाठी आणि मिळाल्यावर ते हरवू नये यासाठी खिलाडीलोक काय वाट्टेल ते राजकारण करतात आणि इथे हा इयान चॅपेल स्वेच्छेने कर्णधारपद सोडतोय. ( हा स्वतःला पतौडी किंवा वाडेकर समजतो की काय ? ) एकूण, प्रत्यक्ष खेळापलीकडचे खरेखुरे क्रिकेट या मेंढ्यापाळू ऑस्ट्रेलियनांना कधी कळायचे नाही, हेच खरे.

या कसोटी क्रिकेटसामन्यांच्या मालिकेच्या पार्श्वभूमीवर भारतीय क्रिकेटचे वर्तमान चित्र रेखाटायची कलात्मक कामगिरी विधात्याने आणि अनंतरावाने सर्वश्री बाळ ज. पंडित आणि श्रीकांत जपे यांच्यावर टाकली आहे, याची रसिकांनी नोंद घ्यावी ही विनंती विशेष.

—अनंतराव


बॉम्बे डाइंग
एकमेव वितरक
पराग
डेक्कन जिमखाना, ● लक्ष्मी रोड, पुणे
आज आपल्यासाठी
खास नवीन प्रकार
बेडशीटस्
व
टॉवेल्स् वर
२० टक्के
सूट

# पक्षांतर

## लोकशाहीस लागलेली कीड

वा. दा. रानडे

गुजरातचे माजी मुख्य मंत्री हितेंद्र देसाई यांचा सत्तारूढ काँग्रेसमध्ये प्रवेश अनपेक्षित नव्हता. गेल्या जूनमध्ये झालेल्या विधानसभेच्या निवडणुकांचेवेळीच ते सत्तारूढ काँग्रेसमध्ये जाणार अशा बातम्या पसरल्या होत्या. संघटनाकाँग्रेसचे जनताआघाडीत सामील होण्याचे धोरण त्यांना पसंत नव्हते; पण निवडणुका पार पडेपर्यंत त्यांनी पक्ष सोडला नाही. निकाल जाहीर झाल्यावर त्यांनी संघटनाकाँग्रेसचा राजिनामा दिला; पण सत्तारूढ काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याबाबत आपण अजून निर्णय घेतलेला नाही असे त्यांनी त्या वेळी सांगितले. तीन महिन्यांनंतर त्यांनी आता हा निर्णय घेतला असून गुजरातच्या राजकारणावर त्याचे दूरगामी परिणाम होण्याचा संभव असल्याने ही घटना महत्त्वाची आहे.

हितेंद्र देसाईंनी एकटयानेच काँग्रेसप्रवेश केला असता तर परिस्थितीत काही फरक पडला नसता; पण त्यांच्याबरोबर त्यांचा गट संघटनाकाँग्रेसमधून बाहेर पडून सत्तारूढ काँग्रेसला मिळणार असल्याने जनताआघाडी अल्पमतात येऊन तिचे सरकार गडगडण्याचा संभव आहे. विधानसभेच्या एकूण १८२ सभासदांत सत्तारूढ काँग्रेसचे पक्षबळ ७५ आहे. निर्णायक बहुमतासाठी किमान ९२ सभासद हवेत म्हणजे संघटनाकाँग्रेसचे किंवा जनताआघाडीतील अपक्ष सभासद असे १७ आमदार सत्तारूढकाँग्रेसला मिळाले तर जनताआघाडीचे सरकार गडगडून सत्तारूढकाँग्रेसच्या हाती सत्ता येऊ शकते. यापेक्षाही अधिक आमदार फुटण्याचा अंदाज हितेंद्रभाईंच्या गोटातून व्यक्त केला जातो. गुजरातमधील राजकीय अस्थिरता संपलेली नाही. मंत्रिमंडळ पाडापाडीचा आणि आयाराम-गयारामचा खेळ यापुढेही चालू राहणार असे दिसते.

आयाराम-गयारामांचे संधिसाधू पक्षांतर हा लोकशाहीला मोठा धोका आहे. पक्षांतराला आळा घालण्यासंबंधीचे बिल पार्लमेंटपुढे दोन वर्षे पडून आहे. हे बिल लौकर पास करून घेण्याची निकड सत्तारूढ पक्षाला वाटत नाही. नाही तर त्यांनी ते केव्हाच पास करून घेतले असते. सरकारे पाडण्याचा खेळ हे बिल पास झाल्यानंतर कसा खेळता येईल ? पण संधिसाधू पक्षांतराबद्दल एकटया काँग्रेसला दोष देणे चुकीचे होईल. विरोधी पक्षही हा खेळ खेळलेले आहेत. किंबहुना १९६७ च्या निवडणुकांनंतर विरोधी पक्षांनीच या खेळाला प्रथम सुरुवात केली. चरणसिंगांचा गट फुटल्याने निवडणुकीनंतर काही दिवसांतच तेथील काँग्रेस सरकार गडगडले. हरियाना, मध्यप्रदेशची सरकारे याच तंत्राचा अवलंब करून पाडली गेली. नंतर काँग्रेसने हाच डाव विरोधी पक्षांवर उलटविला. या बाबतीत कोणाचेही हात स्वच्छ नाहीत हे खरे; पण केंद्रातील सत्तारूढ पक्ष या नात्याने पक्षांतराला आळा घालण्याची आणि निकोप लोकशाही-सकेत रूढ करण्याची मुख्य जबाबदारी काँग्रेस पक्षावर होती. ती त्याने पार पाडली नाही. दुसऱ्या पक्षाचे सभासद फोडून झटपट सत्तासंपादनाचा मोह काँग्रेसला आवरला नाही. तसेच विरोधी पक्षांनाही आवरला नाही. आमच्या लोकशाहीच्या शोकांतिकेचे हे एक महत्त्वाचे कारण आहे.

कायदा केव्हा व्हावयाचा असेल तेव्हा होवो. राजकीय पक्षांनी याबाबतीत सर्वमान्य संकेत का ठरवू नयेत ? पक्षांतर करणाऱ्या सभासदाने विधानसभा किंवा लोकसभेतील आपल्या जागेचा राजिनामा देऊन नव्या पक्षाच्या तिकिटावर निवडून आले पाहिजे हा एकच साधा संकेत सर्व पक्षांनी मानला तरी पक्षांतराला निश्चित आळा बसेल. देशातील सर्वात मोठा पक्ष या नात्याने काँग्रेसने हा संकेत पाळण्यात पुढाकार घेतल्यास संधिसाधू राजकारणाला आळा बसण्यास मदत होईल. गुजरातमधील आजच्या परिस्थितीत काँग्रेसनेते हा संकेत कितपत पाळतात यावर त्या पक्षाची कसोटी आहे; पण या तत्त्वाला बाह्यतः मान्यता दर्शवीत असतानाच त्यातून पळवाटा शोधल्या जात आहेत व या पळवाटांचा आसरा काँग्रेसनेत्यांनी पूर्वी घेतलेलाही आहे. पक्षांतरित सभासदाने राजिनामा देऊन पुन्हा निवडून यावे ही अट फक्त अखिल भारतीय पक्षांच्या बाबतीत लागू करावी. अपक्ष सभासद आणि प्रादेशिक पक्षांना ती लागू करू नये असे काही काँग्रेसनेत्यांनी प्रतिपादन केले आणि या पळवाटेचा आधार घेऊन विहारमध्ये पूर्वी मंत्रिमंडळ बनविले. दोन्ही काँग्रेसपक्ष पूर्वी एकच होते. तेव्हा संघटनाकाँग्रेसमधून काँग्रेसमध्ये येणे हे पक्षांतर नव्हे असाही युक्तिवाद केला जात आहे. गुजरातमध्ये आता होणाऱ्या पक्षांतरांचे समर्थन याच युक्तिवादाच्या आधारे केले जाण्याची शक्यता आहे; पण अशा पळवाटांनी पक्षांतरास आळा घालण्याचा मूळ उद्देशच विफल होत आहे.

पक्षांतरित सभासद नव्या पक्षाच्या तिकिटावर निवडून येत नाहीत तोपर्यंत अशा सभासदांनी एखाद्या पक्षाला दिलेला पाठिंबा हा खरा पाठिंबा नव्हे. हुकमी बहुमताचा दावा करणाऱ्या पक्षाचे खरे बळ अजमावताना असे सभासद त्यातून वगळले पाहिजेत. याबाबतीत निर्णय घेताना राज्यपालांनी ही कसोटी लावली पाहिजे; पण निरनिराळ्या राज्यांतील अनुभव लक्षात घेता आतापर्यंत तरी ती लावली गेलेली दिसत नाही.

हितेन्द्रभाईंच्या काँग्रेसप्रवेशातून उपस्थित होणारा दुसरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे दोन काँग्रेसपक्षांच्या एकीकरणाचा. असे एकीकरण गुजरातच्या हिताचे आहे असे हितेंद्रभाईंचे मत आहे. सत्तारूढ काँग्रेसच्या नेत्यांना असे एकीकरण खरोखर मनापासून हवे आहे का ? सत्तारूढ काँग्रेसचे बळ ज्या राज्यात कमी आहे तेथे सत्तेवर राहण्यासाठी संघटना काँग्रेसच्या सहकार्याची व पाठिंब्याची त्यांना गरज भासते. तेथील संघटनाकाँग्रेसच्या वजनदार नेत्यांशी संपर्क साधून त्यांना काँग्रेसमध्ये आणण्याचे त्यांचे प्रयत्न चालू आहेत. हितेंद्रभाईंना काँग्रेसमध्ये आणण्यात त्यांना यश आले. कामराजांच्या बाबतीत असे प्रयत्न दोन वर्षांपूर्वीच्या पाँडिचरी निवडणुकांपासून चालू आहेत. पाँडिचरी निवडणुकांत दोन्ही काँग्रेसपक्षांनी युती केली होती; पण बहुमत न मिळाल्याने या युतीबद्दलचा सत्तारूढ काँग्रेसचा उत्साह ओसरला. तामिळनाडूतील आगामी निवडणुकांवर लक्ष ठेवून हितेंद्रभाईप्रमाणेच कामराजांना काँग्रेसमध्ये आणण्याचे–निदान निवडणुकीपुरती दोन्ही पक्षांची युती करण्याचे–प्रयत्न होण्याची शक्यता आहे; पण दोन्ही काँग्रेसपक्षांचे एकीकरण होण्याचा संभव दिसत नाही. □

# उत्तर नसलेला प्रश्न

अशोक शंकर साळवी

होऊन गेलेल्या गोष्टींचा मी कधीच विचार करीत नाही. झालं ते झालं, गंगेला मिळालं. वर्तमान समोर आहे. त्याचा विचार करायचा अन् भविष्याचा ठाव घेण्याचा निष्फळ प्रयत्न करीत राहायचे एवढंच आपल्या हाती असतं.

माझ्या पुढ्यात खाली मान घालून बोटांशी चाळे करीत तो उभा होता. मी त्याच्याकडं पाहिलं, अन् मला त्याची करुणा वाटली. बारा-तेरा वर्षांचं कोवळं वय असेल त्याचं ! अंगानं अशक्तच पण डोळे विलक्षण पाणीदार होते त्याचे ! पांढरा शुभ्र हाफ्शर्ट हाफ्खाकी पॅंटमध्ये इन केला होता. बूट, पायमोजे सारं काही व्यवस्थित होतं. मोहन मला न उलगडणारं कोडं होतं; पण त्यालाच मी माझ्या दृष्टीने एक आव्हान समजत होतो.

सकाळचे नऊ वाजायला आले होते. मी वर्तमानपत्र बाजूला ठेवले आणि त्याच्याकडे भेदक नजरेनं पाहिलं. मी त्याला धारदार आवाजात जवळ बोलावलं, ' इकडे ये ! ' पण तो जागेचा हालायलाही तयार नव्हता. तिथंच भिंतीला टेकून उभा राहिला. मी रंग बदलला. सौम्य आवाजात म्हटलं, ' घाबरू नकोस. मी तुला काही मारीत नाही. इकडं, असा जवळ ये ! ' त्यानं माझ्याकडे मान वरती करून पाहिलं. मी त्याच्या डोळ्यांत अविश्वास वाचला. मी समजाविण्याच्या सुरात त्याला म्हणालो,

' मोहन, तुझ्याबद्दल नेहमी तक्रारी येतात. तुला अनेक वेळा शिक्षा करूनही पाहिलं, त्याचा तुझ्यावर काडीमात्र उपयोग होत नाही. इथून पुढं जर तुझ्या वर्तनात सुधारणा दिसून आली नाही तर...? आणि मी गप्प झालो. माझे पुढील शब्द मला उच्चारणं शक्य झालं नाही. जणू त्याच क्षणी माझी जीभ लुळी पडल्याचा भास उगीचच मला झाला. नाही तर पुढे काय ? इथून तुला हाकलून देऊ, घरी पाठवू, असंच ना ? पण ही भाषा मोहनला लावून उपयोगाची नव्हती. सर्व वस्तू एकाच मापात कशा जोखता येतील ? कारण मोहनला तेच हवे होते.

फार मोठ्या श्रीमंत घरातला हा मुलगा ज्या वेळी घरात सर्वांना असह्य झाला तेव्हा त्याचे चुलते त्याला या दूरच्या ठिकाणी घेऊन आले. घरापासून दूर ठेवल्यावर काही परिणाम होतो का हे त्यांना पाहावयाचे होते. वसतिगृहातील वातावरण, चांगल्या मुलांच्या संगतीने तो बदलेल ही वेडी आशा घेऊन ते आले होते. गेले सहा महिने बिलकुल फरक नव्हता. तो होता तिथेच होता.

येथून त्याने सात-आठ वेळा पलायन केले होते. मिळेल त्या मार्गाने, सुचेल त्या युक्तीने. एकदा तर त्याने कमाल केली. द. भारत दर्शनास निघालेल्या एका गाडीच्या ड्रायव्हरशी याने संधान बांधले, अन् तीन आठवड्यांनी घरी पोचला. कुठे होतास, कसा गेलास, काय खाल्लं-पिल्लं—एक चकार शब्द नाही. चुलते परत त्याला इकडे घेऊन यायला निघाले. वाटेत एका स्टॉपवर चुलते पाय मोकळे करण्यासाठी एस्. टी. तून खाली उतरले. एवढी नामी संधी साधून त्याने पोबारा केला व परत माघारी फिरला. बावीस मैल चालत तो घरी गेला. चुलते चक्रावले. हे कार्ट कायमचं काळं का करीत नाही ?

आणि म्हणूनच ' नाही तर तुला येथून



हाकलून देईन ' ही माझी भाषा त्याच्याच पथ्यावर पडणारी होती. तो माझ्याकडे अधूनमधून तिरप्या नजरेने पाहून अंदाज घेत होता. मी निश्चल होतो. मी स्वतःच त्याच्या चुलत्यापेक्षाही जास्त चक्रावलो होतो. मुलाला परत घेऊन जा असे सांगण्यात पराभव होता आणि पराभव स्वीकारायला माझं मन सहसा तयार होईना. मी म्हटलं, ' मोहन, खरं सांग, मी तुला काहीही शिक्षा करणार नाही. काल रात्री तू कोठे होतास ?' त्यानं मान पुन्हा खाली केली व ओठ गच्च मिटून घेतले. पायाच्या अंगठ्याने तो जमीन उकरू पाहत होता.

याला कसा बोलता करावा ? बोलतच नाही, तर खरे-खोटे काय समजावे ? कुठे गेला असेल हा काल रात्री ? झोपला कुठे, रात्रभर काय उद्योग केला ईश्वर जाणे !

इथले सारे नियम धाब्यावर बसवितो. याचं पाहून इतर मुलंही असंच वागतील आणि हा सुधारण्याऐवजी याच्या नादाने चांगली मुलं बिघडतील ही भीती मनात होतीच. मी त्याला जाळ्यात ओढण्यासारखा एक प्रश्न विचारला,

' तुझ्याबरोबर आणखी कोण होतं का ?' त्याने नकारार्थी मान हालवली.

' मग एकटाच होतास ? ' या वेळी होकारार्थी मान हलली.

' अरे, मग सांग ना, एवढ्या रात्री तू एकटाच कुठं गेला होतास ?' तो स्तब्ध.

' हे पहा असं न बोलण्यानं मला काहीच कळणार नाही. मी तुला सांगितलं ना की घाबरू नको. खरं, खरं काय ते स्पष्ट सांग !' त्याने मान वरती केली. मला त्याच्या ओठांची सूक्ष्मशी हालचाल जाणवली. तो काही तरी सांगू इच्छित होता.

' हं, सांग, सांग, कुठं होतास रात्री ?' पुन्हा तो स्तब्ध झाला. खाली मान घालून बोटांशी चाळे करू लागला. मी ऑफ झालो; पण क्षणभरच ! मी स्वतःशीच हसलो. अशा वेळी संयमाने हसणे हाच एकमेव मार्ग आहे.

' जा तू, आज दुपारपर्यंत पुस्तक हातात घेऊन उभा राहा !' याशिवाय दुसरं मी तरी काय करू शकत होतो ? त्याला अभ्यास करायला भाग पाडणे हीच शिक्षा होती, त्याच्या दृष्टीनं ! तो बाहेर गेला अन् अस्फुट हसला; तो आवाज मला ऐकू आला. मला वाईट वाटलं !

मी जेवण केले अन् विद्यार्थ्यांच्या पालकांची पत्रे पाहू लागलो. विद्यार्थ्यास आलेले प्रत्येक पत्र बारकाईने वाचून मगच त्याला ते दिले जात असे.

बाहेर शेजारच्या खेड्यातील सरपंच आल्याचं शिपायानं सांगितलं. हे सरपंच नेहमी येत व शिक्षणाबद्दल पुष्कळशी आस्था असल्यामुळे चर्चा करत. स्वतः शिक्षणास मुकलो हीच जाणीव या आस्थेपाठीमागे कदाचित् असावी. काही का असेना त्यांची आम्हास बरीच मदत होत असे. आज असेच काही तरी काम असावे हा मी अंदाज बांधला. ते समोरच्या खुर्चीवर येऊन बसले. कपाळावरील घाम धोतराच्या सोग्याने टिपत त्यांनी इकडेतिकडे पाहिलं, टेबलवरील वर्तमानपत्राची घडी करून त्या पंख्याने हवा घेत ते म्हणाले, ' काल एक विचित्र प्रकार मला पहायला मिळाला. आपण सांगा म्हणालात तर सांगती. '

' कशाबद्दल आहे?' मी विचारले.

' आपल्या वसतिगृहातील मुलाचीच एक भानगड आहे. '

' भानगड ?' मला काहीच कळेना. मी त्यांच्याकडे प्रश्नार्थक पाहिलं. तशी ते थोडी पुढं झुकून हळू आवाजात म्हणाले, ' काल रात्री एक मुलगा आमच्या गावात तमाशा पहायला आला होता अन् त्यानं सहा-सात रुपये दौलतजादा सुद्धा केला!'

' काय ? दौलतजादा ? तुम्ही त्याला ओळखू शकाल का ? '

' नक्कीच! त्याचा चेहरा मी मुद्दामच चांगला लक्षात ठेवलाय !' मी शिपायाकरवी सात-आठ मुलांना बोलावून घेतले. त्यात मोहनही होता. फक्त एकट्या मोहनलाच न बोलविता मी मुद्दाम सहा-सात विद्यार्थ्यांना बोलावून घेतले. त्या सर्व मुलांतून सरपंचसाहेबांनी मोहनकडेच बोट केले. मी काय समजायचे ते मनाशी समजलो. मी एक आवंढा गिळला. सर्व मुलांना जावयास सांगितले. सरपंचही थोड्या वेळाने निघून गेले. मोहनने जो काही प्रकार केला ते पाहून मी सर्दच झालो. मोहन असे का वागतो हेच एक मोठे प्रश्नचिन्ह माझ्यापुढे उभे होते की, ज्याचे उत्तर माझ्याजवळ नव्हते.

मोहनने केला प्रकार हा काहीच नव्हता असं म्हणण्याची वेळ त्यानं लवकरच आणली.

वसतिगृहातील एक विद्यार्थी पैसे चोरीला गेले अशी तक्रार घेऊन आला. मी त्याला नियमात गप्प बसविले. तू मुळी पैसे जवळ का बाळगलेस ? पैसे चोरीला जाण्याचे प्रकार फारच वाढल्यानंतर त्यावर एक नियम केला. विद्यार्थ्यांनी स्वतःजवळ पैसे ठेवू नयेत. पालकांनी विद्यार्थ्यांना खर्चासाठी पैसे प्रत्यक्षात न देता प्रथम कार्यालयात भरावे व विद्यार्थ्याने हवे तसे घेऊन जावेत. हे एक काम वाढले; परंतु त्यामुळे पैसे चोरीला जाण्याचे प्रकार एकदम थांबले होते. नियमामुळे तो विद्यार्थी काही बोलू शकत नव्हता; पण त्याची चोरी झाली होती हे निश्चित व त्याचा तपास करणे माझे कर्तव्य होते. मी त्या विद्यार्थ्यास तुझा कोणावर संशय आहे असे विचारल्यानंतर त्याने मोहनचे नाव सांगितले. मी त्याला तुझे पैसे चोरीला गेल्याची गोष्ट कोणाजवळ बोलू नकोस असे सांगितले. तो विद्यार्थी निघून गेला.

मी त्या विद्यार्थ्याच्या तोंडाला कुलुप लावले अन् मोहनच्या पेटीचे कुलुप तोडले.

मोहनच्या खोलीत मी प्रवेश केला तेव्हा मोहन तेथे नव्हता. बाहेर कोठे तरी असावा. त्याच्या खोलीत राहणारा विद्यार्थी पुस्तक वाचत होता. मी आल्याचे पाहताच तो गडबडीने उठून उभा राहिला.

' मोहन कुठाय् ? '

पृष्ठ २५ वर


**मोफत ! मोफत ! मोफत !**

# पांढरे डाग

आमचे औषधाचा प्रभाव केवळ तीन दिवसातच पांढरे डागावर दिसू लागून त्याचा रंग बदलू लागतो. आमचे औषध अतिप्रभावी असून त्याचा एकवेळ अवश्य अनुभव घ्या. प्रचाराकरता, एक औषधाची कुपी ट्रायलकरता मोफत दिली जाते. रोगाचे सविस्तर वर्णनासहित संपर्क साधून त्वरित औषध मागवा.

**जवाहर चिकित्सा केन्द्र १०५**

पोष्ट : कतरीसराय ( गया )





# ज्यांच्या पॉलिसींची मुदत पूर्ण झाली आहे अशा ४,००० पॉलिसीधारकांना आम्ही पैसे देऊ शकत नाही... कारण त्यांचा सध्याचा पत्ताच आमच्यापाशी नाही!

## तुम्ही यांतील एक आहात ?

एखाद्याचा सहज विश्वास बसू नये अशीच गोष्ट आहे. आपल्याला आयुर्विमा महामंडळाकडून काही पैसे मिळावयाचे आहेत ही बाब पुष्कळांच्या लक्षातच नसते किंवा यासंबंधी त्यांना काही माहितीही नसते. असं का ?

त्यांचा महामंडळाला कळविलेला पत्ता बदललेला असतो आणि आपल्या नव्या पत्त्यासंबंधी मात्र त्यांनी पुढे काहीच कळविलेले नसते. साहजिकच महामंडळाने पाठविलेले इंटिमेशन फॉर्म आणि डिसचार्ज व्हाऊचर त्यांना मिळालेले नसते.

**तुमच्याकडे अशी पडून राहिलेली पॉलिसी आहे ? पुढील तपशील नीट पहा.**

● तुमच्या पॉलिसीची मुदत केव्हा पूर्ण होते ? मुदत पूर्ण होऊन गेली असल्यास, तत्संबंधी शेवटचा व्यवहार महामंडळाच्या ज्या कचेरीला झाला त्या कचेरीशी संपर्क साधा. या कचेरीशी आपला सध्याचा पत्ता कळवा. ● ज्या पॉलिसीवरील हप्ते भरले गेले आहेत अशीच पॉलिसी चालू असते ● ज्या पॉलिसीवर कमीत कमी दोन किंवा तीन वर्षे हप्ते भरले गेले आहेत ती पॉलिसी पेड-अप असते.

**पेड-अप पॉलिसीवर किती पैसे मिळतील ?**

प्रमाणित रक्कम उदा. रु. १०,००० च्या २० वर्षासाठी असलेल्या पॉलिसीवर तुम्ही ५ वर्षे हप्ते भरले असाल तर तुम्हाला सुमारे २,५०० रु. मिळतील व बोनसही. (१९५६ पूर्वी निरनिराळ्या विमा कंपन्यांकडून काढण्यात आलेल्या पॉलिसींवर वेगवेगळे बोनस दर चालू आहेत.)

४४ लाख रु. चे क्लेम्स निकालात निघण्याची प्रतीक्षा करीत आहेत. २६४८ पेड-अप पॉलिसीज...रक्कम रु. १८.५० लाख. १३८६ चालू पॉलिसीज...रक्कम रु. २५.१२ लाख. आपल्या पॉलिसीसंबंधी काही शंका असेल तर तुमच्या एजंटांशी किंवा महामंडळाच्या नजिकच्या कचेरीशी संपर्क साधा.

**तुमच्या अधिक चांगल्या सेवेसाठी तुम्हीच आम्हाला मदत करा**

# लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इन्डिया

RADEUS/LIC/AS-10

## मूळ लेखक : पियर्स पॉल रीड
## अनुवाद : रवींद्र गुर्जर
## लेखांक : आठ

: १ :

ॲंडीज पर्वतावर अडकून छप्पन्न दिवस झाले. डिसेंबरच्या पहिल्या आठवड्याचे अखेरीस आकाशात प्रथमच दोन मोठे पक्षी घिरट्या घालताना दिसले. सतरा जिवंत मुलांच्या डोक्यावर ते गोल फिरत होते. लांब चोची, तुळतुळीत डोकी आणि पांढरा गळा. पंखांचा पसारा नऊ फूट. मुलांना लगेच भीतीही वाटली की ते खाली झेप घेऊन छतावरचं मांस पळवतील. पिस्तुलानं त्यांना ठार करावं असा विचारही आला; पण अचानक गोळ्यांचा आवाज झाला तर एखादा कडा कोसळायचा अशी धास्ती मुलांना वाटली.

बऱ्याच वेळा पक्षी दिसेनासे व्हायचे; पण दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा आपले हजर. खाली वावरणाऱ्या मनुष्यप्राण्यांच्या हालचाली ते न्याहाळत; पण त्यांनी हल्ला कधीच केला नाही. पुढे ते यायचं बंद झालं. त्यानंतरची जिवंतपणाची दुसरी निशाणी म्हणजे, एक मधमाशी विमानात गुणगुणत शिरली आणि पुन्हा बाहेर पडली; शिवाय एक-दोन माश्या आणि एकदा तर फुलपाखरूही दिसलं.

दिवसा आता चांगली ऊब असे; इतकंच नाही तर काही काही वेळा उष्णता बरीच वाढल्यामुळे मुलांची कातडी काळवंडली आणि ओठ फुटून त्यातून रक्तस्राव होऊ लागला. लिलियानानं मेंडोझामधे मुलीसाठी विकत घेतलेल्या कापडापासून एक तंबू उभारण्यात आला. वरून विमान जाताना तो दृष्टीस पडावा असा त्यामागे हेतू होता. शोध पुन्हा सुरू झाल्याची वार्ता रेडिओमुळे सर्वांना समजली होती.

पण त्यामुळे पुढच्या मोहिमा रद्द होऊ द्यायच्या नाहीत असा मुलांनी निश्चय केला. कॅनेसा, पेरॅडो आणि व्हिजिंटिन या तिघांनी पुन्हा नवा प्रयत्न करावा अशी त्यांची इच्छा होती. पेरॅडोची तशी तयारी होतीच; पण कॅनेसा कुरकुरत म्हणाला, 'आता इथून हलणं अयोग्य होईल. इतकं सुसज्ज विमान आपल्या शोधात निघालंय तेव्हा आपण त्यांना दहा दिवस तरी दिले पाहिजेत. त्यानंतर वाटलं तर आपण निघू. जरुरी नसताना प्राण धोक्यात घालण्यात काय अर्थ आहे?'



कॅनेसा, पेरॅडो आणि व्हिजिंटिन विमानाचं शेपूट सापडवण्यात यशस्वी झाले होते. विमानातला रेडिओ सोडवून घेऊन त्या ठिकाणी पुन्हा ते पोचले. बॅटऱ्यांचा वापर करून संदेश द्यायचा प्रयत्न ते करणार होते. तिकडे पेझ यांच्या मार्गदर्शनाखाली चिलीमधे पालकांचा तपास चालूच होता. जिरार्डची भविष्यवाणी खोटी पाडायची त्यांची इच्छा होती. युरुग्वे एअरफोर्सची मदत मिळवण्यात ते यशस्वी झाले. सी–४७ हे सुसज्ज विमान त्यांच्या दिमतीला देण्यात आलं; पण वाटेतच त्यानं दगा दिला. त्याचं एक इंजिन नादुरुस्त झालं. फेअरचाइल्डमधे राहिलेल्या मुलांच्यात किरकोळ बाचाबाचीचे प्रसंग घडत; पण त्यांची एकी टिकून होती. शेपटाच्या भागात रेडिओवरून संदेश देण्यात मात्र अपयश आलं; पण सी–४७ विषयीची सुवार्ता त्यांना बातम्यांत ऐकायला मिळाली. अर्धवट निराशेनं त्या तुकडीतली मुलं फेअरचाइल्डजवळ जाऊन पोचली. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

बाकीच्या मुलांत संतापाची लाट पसरली. विमान नादुरुस्त झाल्यामुळे मधेच उतरलं, हेही त्यांनी रेडिओवरून ऐकलं होतं. सुटका होणारच या आशेवर स्वस्थ बसणं कठीण होतं. शिवाय अन्नाचाही प्रश्न होताच. प्रेतांचा साठा बर्फाखाली दडला असला तरी ती एक तर सापडत नव्हती किंवा त्यातली काही न फाडायचं ठरलं होतं.

त्यातून आठ आठवडे तसल्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत टिकाव धरल्यामुळे मुलांना खूप अभिमान वाटत होता. स्वतःच्या प्रयत्नांनी तिथून अखेर सुटण्याचं श्रेय आता त्यांना हवं होतं. 'फेअरचाइल्डच्या अपघातामधून वाचावलेले आम्ही तिघं आहोत.' असं सांगितल्यावर प्रथम भेटणाऱ्या एखाद्या शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर कोणते भाव दिसतील याचा त्यांनी अनेक वेळा विचार केला होता. टेलिफोनवरून पालकांशी प्रथम बोलल्यावर त्यांना जाणवणारा सुखद धक्का मुलांनी मनोमन आधीच अनुभवला होता.

फिटोनं वस्तुस्थिती निदर्शनास आणून दिली. तो म्हणाला, 'कॅनेसा, त्यांना आपण मेल्याबद्दल खात्रीच आहे. फक्त आपली प्रेतं ताब्यात घेणं हा त्यांचा उद्देश आहे. शिवाय त्यांची खास व्यवस्था म्हणजे आकाशातून ते खूप फोटो घेतात आणि परत जातात. फोटो धुऊन मग अभ्यास करतात. या प्रकारात कित्येक आठवडे मोडतील. आपल्या डोक्यावरून जरी ते गेले तरी मी म्हणतो तसंच घडणार.'

हा युक्तिवाद कॅनेसाला पटला. पेरॅडोचा प्रश्नच नव्हता. दोघांच्या मागोमाग व्हिजिंटिन जाणारच. अखेरच्या मोहिमेची तयारी सुरू झाली. मांसाचा पुरेसा साठा त्यांच्यासाठी वेगळा ठेवण्यात आला. मागे सांगितल्याप्रमाणे वायरचा उपयोग करून झोपण्यासाठी खोळी बनवण्यात आल्या. पेरॅडोनं विमानाच्या शेपटात सापडलेल्या कॅमेऱ्यानं बरेच फोटो घेतले. दोन पिशव्यांत आवश्यक साधनसामग्री भरण्यात आली. कापडचोपड, मोजे, पाण्याची बाटली, पासपोर्ट, काही पैसे, छोटा चाकू आणि फुटलेल्या ओठांसाठी बायकांची लिप्स्टिक इ. इ. व्हिजिंटिननं दाढीचं सामानही बरोबर घेतलं. शिवाय विमानाचे नकाशे आणि एक पिस्तूल. प्रवासात जरुरी भासेल अशी उपलब्ध असलेली काही औषधं कॅनेसानं बरोबर घेतली.

नऊ डिसेंबर. आज पेरॅडोचा तेविसावा वाढदिवस. कोणाचाही वाढदिवस आला की ते दुःखी होत. मॉन्टेव्हिडिओमधल्या मेजवान्या त्यांना लगेच आठवत. पेरॅडोला एक 'हवाना' सिगार मुलांनी भेट दिला. त्याची ऊबच त्याला अधिक सुखद वाटली.

कॅनेसा अजूनही निघण्याची चालढकल करीत होता. शेवटी एका रात्री फिटो पेरॅडोला म्हणाला, 'कॅनेसाची तयारी नसेल तर मी यायला तयार आहे.'

'नको.' पेरॅडो म्हणाला, 'काळजी करू नकोस. मी त्याच्याशी बोलतोय. तो येईल. त्याला यायलाच पाहिजे. तुझ्यापेक्षा त्याला जास्त सराव झालेला आहे.'

पण लवकरच एक दुर्दैवी घटना घडणार होती.

दिवसेंदिवस न्यूमा तुर्केटी अशक्त होत चालला होता. त्यामुळे दोन 'डॉक्टर्स' चिंतेत पडले. पँको तुर्केटीचा आधीपासूनच जानी दोस्त. म्हणून त्यानं रुग्णावर देखरेख सुरू केली. त्याचं अन्न विमानात नेऊन देणे, पाणी वितळवणे, धूम्रपान करण्यापासून परावृत्त करणे इ. कामं पँको करायचा. धूम्रपान त्याच्या दृष्टीनं घातक होतं. न्यूमा तसा सगळ्यांनाच आवडायचा.

कितीही काळजी घेऊनही त्याची प्रकृती ढासळतच गेली. म्हणून पँको त्याला नेहमीपेक्षा जास्त अन्न द्यायचा. त्याचाही अपेक्षित उपयोग झालाच नाही. उलट त्याचं अवसान गळू लागलं. दाढी खूपच वाढलेली आणि हाडं वर आलेली, असा त्याचा अवतार दयनीय होता. केवळ अस्थिपंजर बाकी होतं. झेर्बिनोनं बाकीच्यांना सांगून टाकलं की त्याचे काही दिवसच बाकी राहिले होते.

इन्शार्टे आणि सॅवेलाप्रमाणेच न्यूमा भ्रमिष्टासारखं बोलू लागला; पण १० डिसेंबरच्या रात्री तो शांतपणे झोपी गेला. सकाळी पँको ऊन खाण्यासाठी बाहेर पडला. न्यूमा काही तासांचा सोबती आहे हे कटु सत्य त्याचं मन स्वीकारू शकत नव्हतं. तेवढ्यात कॅनेसा त्याला म्हणाला, 'आत जा. त्याची लक्षणं ठीक नाहीत.' धावतच तो न्यूमाजवळ गेला. त्याचे डोळे सताड उघडे होते. शेजारी पँको बसलाय याचं त्याला भान नव्हतं. श्वासोच्छ्वास मंद आणि कठीण होत होता. पँको त्याच्यासाठी प्रार्थना म्हणू लागला आणि न्यूमाच्या हृदयाचे ठोके कायमचे थांबले!

दुपारी सगळे विमानात थोडा वेळ आडवे होत. गप्पागोष्टी करत किंवा लहानशी डुलकी काढत. त्या दिवशी दुपारी तीन वाजता ते पुन्हा बाहेर पडू लागले. तेव्हा जेव्हियर म्हणाला, 'सावकाश जा हं! न्यूमाला धक्का लागेल.'

'पण न्यूमा केव्हाच मेलाय!' पेरॅडो म्हणाला.

जेव्हियरला त्या गोष्टीचा पत्ताच नव्हता. आता समजल्यावर

त्याच्या छातीत धस्स् झालं. न्यूमावर त्याचं पाठच्या भावाप्रमाणे प्रेम बसलं होतं. न्यूमाचा लाजरा आणि साधा स्वभाव पाहून त्याला आपल्या मुलांची आठवण होत असे. लिलियानासाठी तो जसा रडला, तसाच ढसढसा रडू लागला.

वादविवाद आणि मतभेदांनी जे काम झालं नव्हतं ते तुर्केटीच्या मृत्यूमुळे साधलं. वेळ न गमावता मोहिमेवर निघालं पाहिजे हे कॅनेसाला पटलं. रॉय, कोच आणि सॅबेला तसेच अशक्त बनले होते. एक दिवससुद्धा वाया घालवणं म्हणजे त्यांना मृत्युमुखात लोटणं. सर्वांनी असं ठरवलं की दुसऱ्या दिवशी सकाळी तिघांनी पश्चिमेच्या दिशेनं चिलीसाठी कूच करायचं.

त्या रात्री विमानात शिरण्यापूर्वी स्ट्राऊचबंधूंना पेरॅडोनं एका बाजूला घेतलं. ' जर तुम्हाला अन्नाचा तुटवडा पडला तर, ' तो म्हणाला, ' माझ्या बहिणीचं आणि आईचं शरीर उपयोगात आणा. अर्थात तशी पाळी तुमच्यावर येऊ नये, पण जीव जगवण्याचा प्रश्न आला तर बेलाशक तसं करा. '

दोघं बंधू त्यावर काहीच बोलले नाहीत, पण पेरॅडोच्या वक्तव्याचा त्यांच्या मनावर जबरदस्त परिणाम झाला होता. त्यांचे चेहेरेच सांगत होते. ◘

## : २ :

सकाळी पाच वाजता तिघांची तुकडी सज्ज झाली. त्यांनी अंगात भरपूर कपडे चढवले होते. उदाहरणार्थ, पेरॅडोनं प्रथम टी-शर्ट, आणि पायात दोन लोकरीचे स्लॅक्स् घातले. त्यावर तीन जीन्स आणि टी-शर्ट वर सहा लोकरीचे स्वेटर्स. डोक्याला जाड मफलर. सगळयात वर सुसानचा फर-कोट आणि मोठं जाकिट. रबी बुटात तळाशी प्लॅस्टिकचे कागद घालून त्यानं पायमोजांचे चार जोड घातले होते. हातात ग्लोव्हज. डोळ्यांवर गॉगल्स. चढताना सोपं जावं म्हणून हातात अॅल्युमिनियमची नळी.

व्हिजिटिनही असाच ' सुसज्ज ' झाला होता. त्याशिवाय पूर्वीप्रमाणेच सामानाची पिशवी आणि मांस-साठा त्याच्याजवळच होता. तो दहा दिवस तरी पुरेल इतका होता. कॅनेसाजवळ झोपायच्या ' खोळी ' होत्या. बाकी अवतार इतर दोघांसारखाच.

निघण्यापूर्वी तिघांनी थोडा ' नाश्ता ' केला. सगळे गप्प बसून होते. गोंधळलेल्या मनःस्थितीमुळे कोणीही भावना शब्दात व्यक्त करू शकत नव्हते. ही संधी अखेरची; ते मनात जाणून होते. पुतण्यासाठी विकत घेतलेले बूट विमानातच ठेवून पेरॅडो म्हणाला, ' हे न्यायला मी लवकरच येईन. मुळीच काळजी करू नका. '

' ठीक, ठीक. ' मुलं ओरडली. त्याच्या आशावादामुळे प्रत्येकाचं हृदय उचंबळून आलं होतं. ' आणि सॅंटियागोमध्ये आपल्यासाठी हॉटेल बुक करायला विसरू नका. ' सर्वांनी तिघा मुलांना वारंवार आलिंगनं दिली. नंतर पेरॅडो, कॅनेसा, व्हिजिटिन मार्गस्थ झाले. या खेपेला दिशा पर्वतशिखरांची होती.

पाचशे यार्ड गेले नसतील तोच विमानातून पॅंकोची आरोळी त्यांना ऐकू आली. ' थांबा थांबा. हा देवीचा पुतळा इथेच राहिला. तो न्या बरोबर. '

मान वळवून कॅनेसा म्हणाला, ' राहू दे त ! तिला तिथेच राहायच असेल. आम्ही हृदयातल्या ईश्वरासह पुढे जाऊ ! '

दरीच्या उलट दिशेनं ते वर चढू लागले. ती दिशा वायव्य होती त्यामुळे पश्चिमेसाठी त्यांना सरळ पर्वतच चढावा लागणार होता चढ विचित्र आणि उंच होता. विमानाच्या होकायंत्राचा वापर करून त्यांनी मार्गक्रमण चालू ठेवलं. चालणं फारच जड जात होतं त्यातून आधीच बर्फ वितळायला सुरवात झाली होती. संरक्षक बूट असूनही गुडघ्यापर्यंत पाय आत बुडत होते. बुटाच्या तळव्यांना बांधलेल्या कुशन्स जड झाल्यामुळे पाऊल टाकणं जिकिरीचं झालं होतं तरीही त्यांची बरीच प्रगती झाली. एका खडकावर बसून दुपारी त्यांनी खाणं उरकलं. दूर अंतरावर अद्याप फेअरचाइल्ड दिसत होतं. छतावर बसून काही मुलं त्यांच्याकडेच पाहत होती.

थोडी विश्रांती घेऊन तिघंही चालू लागले. अंधार पडायच्या आत पर्वतमाथ्यावर पोचायचा त्यांचा विचार होता. कारण उतारावर झोप लागणंच अशक्य होतं. पलीकडे हिरवीगार शेतं, एखादी झोपडी किंवा निदान वनस्पतींनी भरलेल्या टेकड्या केव्हा एकदा दिसतील, यासाठी ते अधीर झाले होते.

पर्वतावरची अंतरं फसवी असतात हा पूर्वानुभव होताच. सूर्य नाहीसा झाला तरी माथ्याचा पत्ताच नव्हता. नाइलाजास्तव तिथेच आडवं व्हावं लागणार हे ओळखून, त्यातल्यात्यात सपाट पृष्ठभाग ते पाहू लागले. तसा कुठेच आढळेना. चढ अक्षरशः उभा होता. एका खडकावर चढता चढता व्हिजिटिन तोल जाऊन कोलमडणारच होता; पण खांद्यावरची जड पिशवी वेळीच फेकून दिल्यामुळे तो थोडक्यात बचावला. तो पूर्णपणे थकून गेला होता. पाऊल टाकताना त्याला ते हातानं उचलावं लागे.

काळोख पडला तसे ते संभ्रमात पडले, गोंधळून गेले. तसाच एक मोठा खडक पाहून पेरॅडो वर चढला. कॅनेसा खाली थांबून वाट पाहत होता. तेवढ्यात पेरॅडो ओरडला, ' लुकाउट ! ' त्याच्या बुटामुळे एक दगड घरंगळत खाली निसटला होता. कॅनेसाचा कपाळमोक्षच व्हायचा; पण तो वाचला. ' तुझा काय बेत आहे ? मला मारायचंय् का ? ' असं म्हणून तो रडायला लागला. दुःखामुळे तो पार खचून गेला.

शेवटी एक बऱ्यापैकी जागा सापडली. ती सपाट नव्हतीच; पण बाजूलाच असलेल्या बर्फाच्या भिंतीमुळे घसरत खाली जाण्याचा धोका तरी नव्हता, म्हणून त्यांनी तिथेच मुक्काम करायचं ठरवलं. तिघंही खास बनवलेल्या खोळीत– पोत्यासारख्या पिशवीत– शिरून झोपेची आराधना करू लागले.

आकाश स्वच्छ होतं. तपमान शून्याखाली कित्येक अंश असूनही खोळीत शिरल्यामुळे बरीच ऊब मिळत होती. तत्पूर्वी थोडं मांस आणि दोन घोट रम त्यांनी घेतली. त्यांच्या जागेवरून खालचं दृश्य भव्य दिसत होतं. बर्फाच्छादित पर्वतांचं चंद्रताऱ्यांच्या फिकट प्रकाशानं उजळलेलं विस्तीर्ण लॅंडस्केपच समोर होतं. त्या सौंदर्यामुळे तिघंही मंत्रमुग्ध झाले. भीती आणि दुःखाचाही पगडा त्यांच्यावर बसला होता.

अखेर त्यांना गुंगी आली. अती थंडी आणि कडक जमीन त्यांना झोपू देत नव्हती. सकाळच्या पहिल्या किरणांनी तिघांनाही जागृतावस्थेतच पाहिलं. सूर्य वर येईपर्यंत ते पिशवीत पडून राहिले. बाजूला खडकावर ठेवलेले बूटही पार गोठून गेले होते. त्याच पडलेल्या स्थितीत त्यांनी दोन घास खाऊन रमचा आस्वाद घेतला.

जसजसा उजेड वाढू लागला तसतसं खालचं दृश्य भराभर बदलू लागलं. कॅनेसाला तिथे बर्फाऐवजी एक रस्ताच दिसू लागला. त्याचे डोळे सगळ्यात तीक्ष्ण. तरी ती कल्पना त्यानं मित्रांजवळ बोलून दाखवली नाही. काही झालं तरी चिली देश पश्चिमेला होता. तरी त्याला रस्त्याचा भास बराच वेळ होतच होता. खालचा बराचसा भाग अद्याप सावलीत होता.

समोरच्या पर्वतांमागून सूर्य वर आल्यावर तिघं चढू लागले. पुढे पेरॅडो, मधे केनेसा आणि व्हिजिटिन मागोमाग. आदल्या दिवसाच्या परिश्रमामुळे त्यांची गात्रं शिथिल झाली होती, थकवा अजूनही कायम होता; पण त्यांना शिखराकडे नेणारा एक मार्ग सापडला.

आता पर्वताचा चढ इतका उभा होता की व्हिजिटिन खाली बघायला धजत नव्हता. कॅनेसाच्या मागे थोडं अंतर ठेवून तो जपून चालत होता. तिघांनाही निराश करून सोडणारी गोष्ट म्हणजे शिखर येता येईना. त्यांच्या समजुतीप्रमाणे अंतर काटलं की पुढे चढण शिल्लक आहेच ! दुपारी थोडं खाऊन त्यांनी विश्रांति घेतली आणि परत चालले पुढे. पुन्हा कालचाच प्रकार. रात्रीपूर्वी माथा गाठता येईल किंवा नाही याची शाश्वती नव्हती. म्हणून आदल्या दिवशीसारखा आडोसा दिसताच त्यांनी थांबायचा निर्णय घेतला.

खाली पाहताना कॅनेसाचे डोळे फिरत नव्हते. दूर अंतरावरची रस्त्यासारखी दिसणारी रेषा आता स्पष्ट दिसत होती. झोपण्यासाठी पिशवीत शिरल्यावर त्याला राहवेना. सूर्यास्त अद्याप व्हायचा होता. त्या रेषेकडे बोट दाखवून तो म्हणाला, 'तिथे असलेली ती रेषा तुम्हाला दिसते का ? मला वाटतं तो रस्ता आहे.'

'मला तर काहीच दिसत नाही,' नँदो म्हणाला. त्याला दूरचं दिसत नसे. 'पण तो रस्ता असणं शक्यच नाही. कारण आपण पूर्वेकडे तोंड करून बसलो आहोत आणि चिली पश्चिमेला आहे.'

'ते मला माहीत आहे.' कॅनेसा म्हणाला, 'तरीही माझी खात्रीय् की तो रस्ताच आहे. तिथे बर्फसुद्धा अजिबात नाही. तुला नाही दिसत, टिंटिन ?'

व्हिजिटिनची दृष्टीही पेरॅडोपेक्षा चांगली नव्हती. डोळे बारीक करून त्यानं खाली पाहिलं. 'मला एक रेषा दिसतीय् खरी.' तो म्हणाला, 'पण तो रस्ता असेलच असं सांगता येत नाही.'

'रस्ता नक्की नसणार.' पेरॅडो उद्गारला.

'ती खाणही असू शकेल.' कॅनेसा म्हणाला, 'मी कुठे तरी वाचलंय् की इथेच काही तांब्याच्या खाणी आहेत.'

थोडा वेळ थांबून तो म्हणाला, 'मला वाटतं आपण मागे फिरावं.

'मागे फिरावं ?' पेरॅडो चकित होऊन म्हणाला.

'होय, परत जावं हे उत्तम. हा पर्वत फारच उंच आहे. माथ्यापर्यंत आपण कधी पोचणारच नाही. एकेक पावलाबरोबर आपण आपल्या प्राणाशी खेळत आहोत. पुढे तसंच जाणं मूर्खपणाचं ठरेल !'

'मागे वळून आपण काय करायचं ?' पेरॅडोनं विचारलं.

'आपण तो रस्ताच गाठू या.'

'आणि तो रस्ताच नसेल तर ?'

'हे बघ,' कॅनेसा म्हणाला, 'माझी दृष्टी तुझ्यापेक्षा चांगली आहे आणि माझं म्हणणं आहे की तो रस्ताच आहे.'

'कदाचित असेलही किंवा नसेलही. एक गोष्ट मात्र नक्की आहे की चिली पश्चिमेकडेच आहे. त्या दिशेला चालत राहिलं की तो देश लागल्यावाचून राहणार नाही.'

'आपण तसे जात राहिलो तर जिवाची आशाच सोडायला हवी.' कॅनेसा म्हणाला.

पेरॅडोनं एक दीर्घ सुस्कारा सोडला.

'मी तरी मागे जाणार बुवा !' कॅनेसा.

'आणि मी पुढे.' पेरॅडो म्हणाला, 'त्या रस्त्यापर्यंत जाऊन तुझ्या चूक लक्षात आली की खूप उशीर झालेला असेल. पुन्हा या ठिकाणी येणं अशक्य. तिथे खाली आधीच अन्नाचा तुटवडा आहे. या मोहिमेएवढं अन्न पुन्हा आपल्याला मिळणार नाही. आपल्याला वाचण्याची आशा कायमची सोडावी लागेल.'

त्यांच्यातील मतभेद न मिटवताच ते झोपी गेले. उजाडल्यावर पेरॅडोनं पुढे जाण्याची तयारी केली. कॅनेसाला विमानापर्यंत जाण्याची खात्री वाटेना. मग त्यानं सुचवलं, 'तुम्ही दोघं पुढे जाऊन पर्वतमाथा लागतोय का ते पहा. सामान इथे माझ्याजवळच ठेवा.' ती गोष्ट मान्य करून दोघंजण निघाले; पण अतिउत्साहाच्या भरात पेरॅडो खूप पुढे गेला. व्हिजिटिन बराच मागे पडला.

चढ अधिकच कठिण होऊ लागला. हात आणि पायांसाठी बर्फात खाचा करूनच पेरॅडोला वर चढता येत होतं. त्याचाच उपयोग करून व्हिजिटिन चालला होता. पाय जर का सटकला तर शेकडो फूट खाली कोसळण्याची शक्यता होती; पण तरीही त्याचा उत्साह मावळला नाही. बर्फाच्या चढामुळे आणि वर निळ्या रंगाचं आकाश दिसत असल्यामुळे शिखर आता दूर नाही अशी त्याला खात्री वाटत होती. गिर्यारोहकाप्रमाणे त्याचं औत्सुक्य शिगेला पोचलं होतं. पलीकडे काय आहे हे पाहण्यासाठी तो उतावीळ झाला होता. त्यानं स्वतःला बजावलं, 'मला दऱ्याखोरी दिसणार आहेत. नदीही दिसणार आहे. शिवाय हिरवंगार गवत आणि हिरवी झाडं—' आणि चढ संपला. समोर दहा-बारा फूट सपाट भाग आणि पलीकडे लगेच उतार. त्यानं शिखर गाठलं होतं.

पेरॅडोचा आनंद काही क्षणच टिकला आणि त्याचे पाय डगमगू लागले. पलीकडे हिरवीगार रम्य वनश्री नव्हती तर बर्फानं आच्छादलेल्या आणखी कित्येक पर्वतमालिका. तो उभा होता तिथून ते




दृश्य स्पष्ट दिसायला कसलाच अडथळा नव्हता. त्याला प्रथमच असं तीव्रतेनं वाटलं की संपलं सारं, सगळ्यांचीच आशा धुळीला मिळाली. गुडघ्यात मान घालून त्यानं ईश्वराचा अन्यायाविरुद्ध निषेध करायचा प्रयत्न केला. शिव्या तोंडात येऊ लागल्या; पण त्या बाहेर पडेनात. पुन्हा आजूबाजूला पाहिल्यावर त्याचं मन ताळ्यावर आलं. शिखर सर केल्याचा पराक्रम काही कमी नव्हता! इतर शिखरं खाली दिसत होती याचा अर्थ त्यानं अँडीजवरील सर्वांत उंच शिखर गाठलं होतं. 'मी हा पर्वत अखेर चढलो. माझ्या वडिलांमागे मी याला माउंट सेलर म्हणेन.'

त्यानं फुटलेल्या ओठांसाठी बरोबर घेतलेल्या लिप्स्टिकनं जवळच्या एका प्लॅस्टिक-पिशवीवर लिहिलं 'सेलर.' आणि ती माथ्यावरच्या एका दगडाखाली ठेवून दिली. नंतर निसर्गदृश्याचा रसास्वाद घेण्यासाठी तो खाली बसला.

त्याच्या एक गोष्ट लक्षात आली की पश्चिमेला असलेल्या एकूण शिखरांमधल्या डावीकडच्या दोन पर्वतांवर बर्फ अजिबात नव्हता. 'पर्वतमय प्रदेश कुठे तरी संपलाच पाहिजे. म्हणजे ते दोन्ही चिलीमध्ये मोडत असावेत,' तो मनात म्हणाला. त्याला नक्की काय ते ठाऊक नव्हतं; पण या नव्या आशावादामुळे त्याची उमेद पुन्हा वाढली. एवढ्यात त्याला व्हिजिटिनचा आवाज ऐकू आला. तो म्हणाला, 'परत जाऊन कॅनेसाला घेऊन ये. त्याला म्हणावं हा मार्गच योग्य आहे. स्वतः वर येऊन खात्री करून घे म्हणावं बेटया!' व्हिजिटिन मागे वळल्याची खात्री करून घेऊन तो पुन्हा निसर्गसौंदर्य डोळ्यांनी लुटू लागला—त्यानं जिंकलेल्या 'माउंट सेलर'वर आरामात बसून.

दोघांनी वर चढायला सुरुवात केल्यावर कॅनेसा त्याचा 'रस्ता' बघत बसला होता. बदलत्या प्रकाशाबरोबर त्याचा रंगही बदलत होता. तो रस्ताच होता याबद्दल त्याची अधिकाधिक खात्री होत चालली. दोन तासांनंतर व्हिजिटिन परत आला. त्यानं पेरॅडोला शिखर सापडल्याची बातमी दिली.

'तो नक्की माथ्यावर होता याची तुला खात्री आहे?'

'अर्थात, शंकाच नाही.'

'तू तिथे गेला होतास?'

'नाही, पण नँदो म्हणतो की तिथून अप्रतिम दृश्य दिसतं. तो म्हणाला की आता सगळं काही ठीक होईल.'

मोठ्या नाखुषीनंच कॅनेसा उठला आणि पर्वत चढू लागला. पिशव्या व्हिजिटिनकडे देऊनही त्याला पेरॅडोपेक्षा एक तास अधिक लागला. आधीच्या पावलांवर पाऊल ठेवून तो जात होता. शिखर जवळ येताच त्यानं मित्राला हाक मारली. पेरॅडोनं परत आरोळी ठोकली. शेवटी एकदाचा तो तिथे पोचला. व्हिजिटिन खालीच थांबला होता.

पेरॅडोला आधी जसा धक्का बसला तसाच कॅनेसालाही बसला. डोळे ताणताणून तो समोरच्या पर्वतांकडे बघतच राहिला. 'खलास आपण.' तो म्हणाला, 'इथेच संपलं सारं. त्यातून पार पडायची सुतराम शक्यता नाही.'

'पण ते बघ की.' पेरॅडो म्हणाला, 'डावीकडे, दिसलं? दोन पर्वतांवर बर्फ मुळीच नाही.'

'ते तिथले म्हणतोयस का?' पश्चिमेकडे बोट दाखवून तो म्हणाला.

'होय तेच.'

'पण ते कित्येक मैल दूर आहेत. तिथे पोचायला किमान पन्नास दिवस लागतील.'

'पन्नास दिवस काय म्हणतोस? आपण हा पर्वत उतरून जाऊन त्या दरीतून मार्ग काढला की तिथे पोचतो.'

पेरॅडोच्या खुणेकडे लक्ष देऊन कॅनेसा म्हणाला, 'शक्य आहे; पण पन्नास दिवस लागणारच. आपल्याकडे तर दहा दिवस पुरेल इतकंही अन्न नाही.'

'ठाऊक आहे.' पेरॅडो म्हणाला, 'पण मी त्यावर विचार केलाय्. आपण व्हिजिटिनला मागे पाठवून देऊ शकू.'

'त्याल ते आवडेल असं मला नाही वाटत.'

'आपण सांगितलं तर तो परत जाईल. त्याच्या वाटयाचं अन्न आपण ठेवून घेऊ. आपण काळजीपूर्वक ते उपयोगात आणलं तर ते वीस दिवस सहज पुरेल.'

'आणि त्यानंतर काय?'

'त्यानंतर आपल्याला मार्ग सापडेल, आपण पोचूसुद्धा.

'कुणाला ठाऊक?' कॅनेसा म्हणाला, 'मी आपला मागे जाऊन त्या रस्त्याच्या दिशेला लागतो.'

'मग जा बघू.' पेरॅडो तुटकपणे म्हणाला, 'मागे जा आणि तुझा रस्ता शोधून काढ. मी मात्र चिलीकडे जाणार!'

ते दोघंही आले त्या मार्गाने मागे परतले. व्हिजिटिनपाशी पोचेपर्यंत दुपारचे पाच वाजले. तोवर टिंटिननं पाणी वितळवून ठेवलं होतं, त्यामुळे त्यांची तहान भागली. नंतर तिघांनी खाऊन घेतलं. खाताना कॅनेसा शक्यतो सौम्य आणि सहज शब्दांत व्हिजिटिनला म्हणाला, 'हाय्, टिंटिन, तू विमानात परतलास तर बरं असं नँदोचं मत आहे. त्यामुळे आम्हाला अधिक अन्न मिळू शकेल.'

'परत जाऊ?' चमकून व्हिजिटिन म्हणाला, 'जरूर. तुम्हाला तसं वाटत असेल तर जाईन.' आणि त्यावर कोणी काही बोलायच्या आत पाठीवर पिशवी टाकून तो उठलाही.

'आज रात्री नको.' कॅनेसा म्हणाला, 'उद्या सकाळी चालेल.'

'उद्या सकाळी? ओ. के. फाइन.'

'तुला वाईट नाही ना वाटलं?'

'छे, बिलकुल नाही. तुम्ही म्हणाल तसं.'

'तू पोचल्यावर मुलांना सांग, की आम्ही पश्चिमेकडे गेलो. समजा, नव्या विमानानं तुझी सुटका केली तर आम्हाला विसरू नकोस.'

रात्रभर कॅनेसा जागा होता. पेरॅडोबरोबर जावं का फेअरचाइल्डकडे परतावं याचा निर्णय त्याला घेता येत नव्हता. त्यानं ताऱ्यांकडे बघत पेरॅडोबरोबर विचारविनिमय सुरू केला. व्हिजिटिन तोपर्यंत गाढ झोपला. सकाळी उठताना कॅनेसाचा पक्का निश्चय झाला होता. तो पेरॅडोला साथ देणार होता. व्हिजिटिनच्या वाटयाचं मांस आणि इतर उपयुक्त वाटलेलं सामान त्यानं काढून घेतलं. त्या दिवसापुरतं फक्त त्याच्यासाठी ठेवून दिलं. व्हिजिटिन निघण्यासाठी तयार झाला.

'मला सांग, कॅनेसा,' तो म्हणाला, 'आपण खाऊ नये असा शरीराचा भाग कोणता?'

'कोणताच नाही.' कॅनेसा म्हणाला, 'प्रत्येक अवयवात पोषक गुणधर्म आहेतच.'

'फुप्फुसं देखील ?'

'होय ती सुद्धा.'

व्हिजिटिननं मान डोलावली. पुन्हा तो म्हणाला, 'हे बघा, तुम्ही पुढे जाताय आणि मी मागे. तुम्हाला माझी आणखी एखादी वस्तू हवीय का ? मुळीच संकोच न करता मागा. कारण आम्हा सर्वांचे प्राण वाचणं तुमच्या यशावर अवलंबून आहे.'

'अं, मला ती लोकरीची कानटोपी चालेल.' व्हिजिटिनला आपादमस्तक न्याहाळून कॅनेसा म्हणाला.

'ही ? तू हीच म्हणतोय्स का ?' डोक्याला हात लावून टिंटिन म्हणाला.

'हो, तीच की.'

'मी......अं......तुला ती खरंच पाहिजे ?'

'टिंटिन, मला जर तिची गरज नसती तर मी मागितली असती का ?'

व्हिजिटिननं मोठ्या कष्टानं ती काढून दिली. 'बराय्, गुडलक.' तो म्हणाला.

'सेम टू यू.' पेरॅडो त्याला म्हणाला, 'खाली उतरताना काळजी घे.'

'जरूर घेईन.'

'सांगायला विसरू नको.' कॅनेसा म्हणाला, 'फिटोला म्हणावं आम्ही पश्चिमेकडे गेलो. तुमची सुटका झाली तर आमचाही शोध घ्या.'

'मुळीच काळजी करू नका.' व्हिजिटिन म्हणाला. दोन साथीदारांना कडकडून भेटून तो पर्वत उतरू लागला. ◘

## : ३ :

विमानात राहिलेली तेरा मुलं तिघांची प्रगती बघत राहिली. पहिल्या दिवशी त्यांना सापडवून काढणं सोपं गेलं; पण दुसऱ्या दिवशी फक्त ठिपकेच दिसू लागले. एका दिवसात समोरच्या पर्वत-शिखरावर तिघंजण पोचतील असा त्यांचा अंदाज होता; पण वेग फारच कमी पडत होता. या गोष्टीमुळे त्यांच्यात फारच निराशा पसरली. दीड दिवसात निम्मं अंतरसुद्धा संपलं नव्हतं. दुसऱ्या दिवशी दुपारनंतर ती दिसेनाशी झाली.

त्याच सुमारास एक विमान पर्वताच्या शिखराजवळून जाताना दिसलं. खूण करण्यासाठी मुलं सज्ज झाली, तेवढ्यात ते पश्चिमेकडे निघून गेलं.

तिघांच्या तुकडीला यश मिळावं अशी प्रार्थना करण्याखेरीज आता त्यांच्या हातात काहीच नव्हतं. तेराजणांपुढे अन्य प्रश्न होतेच. मुख्य म्हणजे अन्नसाठा. आसमास बर्फाखाली दडलेली बरीच प्रेतं अद्याप सापडली नसली तरी त्यामागे न लागता, शेपटाकडील भागातून खाली दूरवर फेकली गेलेली शरीरं हुडकण्याचा फिटोनं निर्णय घेतला. दूरवर काही काळे ठिपके आणि आकार दृष्टीस पडत होते. ती मुलांची शरीरं असली तर कुजू नयेत म्हणून त्यावर बर्फ टाकणं आवश्यक होतं.

सात आठवड्यांपूर्वी झेर्बिनोनं ती मृत शरीरं शोधून काढली होती. म्हणून फिटो आणि त्यानं पुन्हा तिथे जायचं ठरवलं. १३ डिसेंबरला भल्या पहाटे ते दोघं निघाले. बर्फाचा पृष्ठभाग अद्याप टणक असल्यामुळे ते भराभर पुढे जात होते. मधेमधे विश्रांती घेत दोघंही फेअरचाइल्डकडे दृष्टिक्षेप टाकत होते. जसजसं पुढे जावं तसतशी नवनवीन उंच शिखरं दिसू लागली. ती पाहून त्यांची छाती दडपून गेली. 'पर्वतमालिकांच्या मधोमध आपण अडकून पडलो असलो तर त्यातून बाहेर पडणं अशक्यच' हा विचार त्यांना अस्वस्थ करू लागला. हे शेकडो मैलांचं अंतर ओलांडून कॅनेसा, पेरॅडो, व्हिजिटिन चिलीपर्यंत सुखरूप पोचण्याची शक्यता किती ? दहा दिवसांच्या वर अन्न त्यांच्याकडे नव्हतं.

'आपल्याला नवी तुकडी मोहिमेवर धाडायला पाहिजे.' फिटो म्हणाला. 'गेल्या खेपेपेक्षा जास्त अन्न बरोबर देणं जरुरीचं आहे.'

'कोणाला पाठवायचं ?' झेर्बिनोनं विचारलं.

'आपण दोघं जाऊ शकू आणि कार्लिटस किंवा फार तर डॅनियल.'

'कदाचित विमान आपल्याला आधी शोधून काढील.'

थोडा वेळ ते थांबले. फेअरचाइल्डचं छत पांढरं असल्यामुळे आता ते दिसेनासं झालं होतं; पण विमानाबाहेर काढलेल्या सीट्स, हाडं आणि कपडे तेवढे दिसू शकत होते.

'आपण सगळी हाडं तशीच ठेवून देऊ.' फिटो म्हणाला, 'दुरून फक्त तीच दिसू शकताय्त.'

दोन तास वर चढल्यावर त्यांना हव्या त्या ठिकाणची पहिली निशाणी सापडली. एक जाकिट तिथे पडलं होतं. त्यावरचा बर्फ झटकून फिटोनं ते स्वेटरवर चढवलं.

थोड्याच वेळानं पाठीवर पडलेलं एक प्रेतही आढळलं. तो डॅनियल शॉ होता. त्याला पाहून फिटोला धक्काच बसला. कारण तो त्याचा चुलतभाऊ होता. त्याला खाण्याची कल्पना शहारे आणणारी होती. तो झेर्बिनोला म्हणाला, 'इतर काही प्रेतं सापडतात का आधी बघू.'

पृष्ठभाग आता भुसभुशीत होऊ लागला होता. झेर्बिनोच्या आठवणीप्रमाणे अपेक्षित विभागात गेल्यावर विमानाचे काही तुकडे दिसू लागले; पण प्रेतं अदृश्यच झाली होती. आता सगळ्यांची गरज लक्षात घेता फिटोला चुलतभावाचं प्रेत नेण्याखेरीज गत्यंतर उरलं नव्हतं. तिथेच सापडलेल्या एका ॲल्युमिनियमच्या पत्र्यावरून ते प्रेत त्यांनी ओढत न्यायला सुरुवात केली. उतार असल्यामुळे अत्यंत कमी श्रमात फेअरचाइल्डच्या पातळीपर्यंत ते जाऊन पोचले; पण तो भाग दरीच्या भलत्याच टोकाला होता. प्रेत ओढताना कष्ट पडले नसले तरी एकूण झालेल्या दगदगीमुळे दोघंही खूपच थकून गेले होते. त्याच ठिकाणी बर्फात प्रेत पुरून दुसऱ्या दिवशी विमानापर्यंत न्यायचं त्यांनी ठरवलं.

हातानं खड्डा खणत असतानाच त्यांचे चार मित्र त्या दिशेन येताना दिसले. 'ओ. के. बॉईज ?' एकानं विचारलं.

दोघांनी काहीच उत्तर दिलं नाही.

'तुम्ही इतक्या वेगानं खाली येत होता की घसरून मरताय् काय

असं आम्हाला वाटलं.'

पुन्हा ते काहीच बोलले नाहीत.

'तुम्हाला काही सापडलं का नाही ?'

'हो.' फिटो म्हणाला. 'डॅनियलचं प्रेत मिळालं.'

एकही शब्द न उच्चारता सगळे विमानात परतले. दुसऱ्या दिवशी डॅनियलचं ताठ झालेलं शरीर ते घेऊन आले. जेव्हा सगळा साठा संपेल त्याच वेळी नाइलाजास्तव ज्या प्रेतांचा वापर करायचा असं ठरलं होतं, त्यामधे डॅनियललाही सामील करण्यात आलं. फिटोच्या भावना लक्षात घेऊन.

पेझ आणि अल्गोर्ता नव्या मोहिमेवर बाहेर पडले. बऱ्याच वेळानंतर त्यांनाही एक शरीर आढळलं. त्याचा चेहरा आणि हात उघडे पडले होते. उन्हामुळे तो भाग काळवंडला होता. डोळे जाग्यावर नव्हते. कदाचित त्या मोठ्या पक्ष्यांनी ते खाल्ले असावेत. बर्फ वितळू लागल्यामुळे डॅनियलसारखंच ते प्रेत पुरून ठेवून दोघं विमानाकडे परतले. दुसऱ्या दिवशी त्या जागेवर तीन मुलं आली. अल्गोर्ता त्यात होताच. सर्व शरीर नेण्यापेक्षा रोजच्यासारखे तुकडे करून नेणं सोयीचं जाईल असं ठरवून त्यांनी कापायलाच सुरुवात केली. मांस आणि चरबी रग्बी मोज्यांत भरून, त्यांच्या इच्छेनुसार तिघांनीही खाणं तिथेच उरकलं.

फेअरचाइल्डकडे परतल्यावर त्यांना एक विलक्षण दृश्य दिसलं. विमानातली सारी मुलं बाहेर मोकळ्या जागेत उभी राहून आकाशाकडे पाहत होती. तिथेच पूर्वी मोठा क्रॉस काढलेला होता. काहीजण एकमेकांना मिठ्या मारू लागले, काही जोरजोरात प्रार्थना म्हणू लागले.

क्रॉसच्या मध्यावर डॅनियल फर्नांडिझ हातात रेडिओ घेऊन उभा होता. मधूनच कानालाही लावत होता. 'त्यांना हा क्रॉस दिसला आहे.' तो म्हणाला. 'आत्ताच आम्ही रेडिओवर ऐकलं की सान्ता एलेना या नावाच्या पर्वतावर त्यांना क्रॉस दिसला.'

त्यांच्यात नव्यानं सामील झालेल्या तिघांना खूपच आनंद झाला. सान्ता एलेना म्हणजे मागच्याच पर्वताचं नाव असणार. डॅनियल रेडिओ सोडायला तयार होत नव्हता. आता कुठल्याही क्षणी सुटका होणार या अपेक्षेनं सगळे वाट बघू लागले. युरुग्वेच्या सी–४७ या विमानाबरोबरच चिली आणि अर्जेंटिनाची विमानंही क्रॉसचा शोध घेत असल्याची वार्ता त्यांना कळली. खूप जणांनी असं ठरवलं की त्यांना मुली झाल्या तर 'एलेना' नाव ठेवायचं.

पण हेलिकॉप्टर आलंच नाही. एक मोठा कडा कोसळल्याचा आवाज मात्र आला. संध्याकाळ होऊन गेल्यावर दारुण निराशेनं मुलं विमानात शिरली. मग शोध चालला होता तरी कुठे? ◻

## : ४ :

पंधरा डिसेंबरच्या सकाळी बाहेर आरामात पहुडलेल्या मुलांना समोरच्या पर्वतावरून काही तरी वेगानं खाली येत असल्याचं दिसलं. आधी त्यांना वाटलं की बर्फावरून घसरलेला एखादा दगडच असावा; पण हळूहळू त्यांच्या लक्षात आलं की तो कोणी तरी माणूसच होता. अरेच्चा! तो तर व्हिजिंटिन! तो गडगडतोय असं आधी वाटत होतं; पण वेगावर त्याचा ताबा असल्याचं त्यांना लगेच कळलं.

तेरा मुलांचे चेहेरे बघण्यासारखे झाले होते. एकजात सगळे अवाक्! एक तर बाकीचे दोघं ठार झाले असावेत, किंवा मागून येत असणार! व्हिजिंटिन त्यांच्या पुढे आला असावा. काहीजणांना उगीचच आशा वाटली की शिखरावर विमानाला ते तिघं दिसले असतील.

व्हिजिंटिन त्यांच्यात आल्यावर त्यानं सारा खुलासा केला. 'नँदो आणि कॅनेसा पर्वतमाथ्यावर पोचले.' तो म्हणाला, 'त्यांनी मला मुद्दामच मागे पाठवलं.'

'पण त्याच्यापलीकडे काय होतं?' सगळ्यांनी एकच गिल्ला केला.

'आणखी पर्वत... नजर जाऊ शकली तिथपर्यंत पर्वतच पर्वत. मला वाटतं, त्यातून पलीकडे जाणं कठीणच आहे.'

हिरव्यागार दऱ्याखोऱ्यांचं स्वप्नही धुळीला मिळालं होतं. वस्तुस्थितीची जाणीव सर्वांना पुन्हा एकदा झाली. व्हिजिंटिनच्या वक्तव्यानंतर मुलं खिन्न झाली. 'चढ म्हणजे मरणाचा होता.' तो म्हणाला, 'साक्षात मृत्यूच. वर चढायला तीन दिवस लागले. तसेच चढ पुढेही असतील तर त्यांची धडगत नाही.'

'खाली यायला तुला किती वेळ लागला?'

तो हसला. 'फक्त पाऊण तास. खाली येण्यात काही अडचणच नाही. गंमत म्हणजे पश्चिमेपेक्षा पूर्वेलाच कमी बर्फ आहे. आणि कॅनेसा म्हणाला की त्याला रस्ता दिसला.'

'रस्ता? कुठे?'

पूर्वेकडे.'

फिटोनं मान हलवली. 'पण ते कसं शक्य आहे? चिली तर पश्चिमेकडे आहे.'

'हो ना.' काही तरुण मुलं म्हणाली, 'चिली आहे पश्चिमेला... चिली आहे पश्चिमेला.'

त्या दुपारी व्हिजिंटिनला किती मांस द्यावं यावर मतभेद झाले. 'पण मी नुकताच मोहिमेवरून परतलोय्. गेलेली शक्ती परत येण्यासाठी मला जास्त खायला हवं. मी फार खाल्लंच नाही. सगळं त्या दोघांनाच देऊन टाकलं.' तो म्हणाला.

त्या वेळी त्याला थोडं अधिक मांस देण्यात आलं, पण एका अटीवर. दुसऱ्या दिवसापासून त्याला इतरांसारखंच समजलं जाणार. म्हणून तो विमानाभोवती फुफ्फुसांचा शोध घेत फिरत राहिला. काही सापडली; पण त्यांवर बर्फ नसल्यामुळे कुजायला लागली होती. त्याला गोळा करताना पाहून इतर जणांनी विचारलं, 'तू ती खाणार बिणार आहेस की काय?'

'अर्थातच.'

'मग तू आजारी पडशील बरं!'

मुळीच नाही. मी कॅनेसाला आधीच विचारून घेतलंय्.'

त्याला काहीच त्रास झाला नाही, हे पाहून दुसऱ्या दिवसापासून इतरही काही मुलांनी त्याचं अनुकरण केलं. आता 'अन्ना'ची कमतरता नव्हती. कारण बर्फ मोठ्या प्रमाणात वितळल्यामुळे दडलेली प्रेतं उघड्यावर येऊ लागली होती; पण चवीतल्या बदलासाठी

त्यांना फुप्फुस खावंसं वाटलं. पाच प्रेतांना गरज लागली तरच हात लावायचं ठरलं होतं. वैमानिकांची दोन अद्याप त्यांच्या केबिनमध्येच पडली होती. निदान पाच-सहा आठवडे तरी तशी वेळ येणार नव्हती. बर्फामुळे प्रेतांचं उत्तम रक्षण झालं होतं.

नवा 'साठा' उपलब्ध झाला तरी स्ट्राऊचबंधूंनी कोणालाही आधाशीपणा करू दिला नाही. नव्या मोहिमेची गरज पडली तर जास्त अन्न बरोबर न्यावं लागणार होतं. मनुष्यशरीराचं मांस खाण्याबद्दल आता त्यांना पूर्वीसारखी शिसारी येत नव्हती. कोणत्याही गोष्टीची मनाला एकदा सवय झाली की बस्स् !

अलीकडे ऊन इतकं कडक असायचं की विमानाच्या छतावर मांस भाजता यायचं. बर्फ वितळल्यानंतर वरून लहानमोठे खडक मोकळे होऊन खाली घसरताना दिसत होते. त्यांची मुलांना फार भीती वाटली. त्यांना आता बरेच पक्षी दिसू लागले. वातावरणात खूप ऊब आली होती. कॅनेसा आणि पेरॅडोच्या यशावर ते विसंबून होते. काही दिवस वाट पाहून दोन किंवा तीन जानेवारीला दुसरी तुकडी बाहेर पडणार होती.

कापलेलं मांस पळवण्याचे प्रकार वारंवार होऊ लागले. सगळ्या मुलांचा पकोवर संशय होता. हेरगिरीत झेर्बिनो तयार असल्यामुळे त्यानं एक डाव टाकला. सोयीनुसार लहानमोठे तुकडे प्रथम कापले जात. पुढच्या गटात ते 'पास' करून त्यांचे छोटे छोटे समान तुकडे करण्यात येत. या वेळी पॅंकोमार्फत कमीजास्त आकाराचे तुकडे पलीकडे देण्यात आले. त्याला आपल्यावर लक्ष आहे याची जाणीवच नसल्यामुळे इकडे तिकडे हळूच बघून तो मधूनच एक तुकडा त्याच्या सीटखाली टाकत होता. दोन-तीन असेच हडप केलेले पाहून झेर्बिनोनं फिटोला ते दाखवलं.

पुढच्या खेपेला झेर्बिनो पॅंकोला रोखठोक म्हणाला, 'काय चाललंय काय तुझं ?'

'काय चाललंय ?'

'तुझ्या सीटखाली काय आहे ?'

'तू कशाबद्दल बोलतोय्स ? पॅंकोनं विचारलं. 'हे ? हा मांसाचा तुकडा ? ओह ! हा सकाळी डॅनियलनं मागे ठेवला होता.'

फिटो आणि झेर्बिनोनं राग आटोक्यात ठेवला; पण एडचुअर्डोला राहवलं नाही. पॅंकोला समजेल अशा रीतीनं त्यानं शिव्या द्यायला सुरुवात केली. शेवटी असह्य झाल्यावर पॅंको म्हणाला, 'हे काय चाललंय ? तू माझ्याबद्दल सगळं बोलतोय्स का ?'

'अर्थात, तुझ्याबद्दलच. भीती आहे का ?' एडचुअर्डो म्हणाला, 'अन्न नाहीसं होण्याची ही सातवी वेळ आहे. तुझ्या सीटखालच्या ट्रेमध्ये चोरलेलाच तुकडा आहे !'

पॅंकोचा चेहेरा पडला. तो काहीच बोलला नाही. शेवटी फिटो म्हणाला, 'जाऊ दे. आपण ते सोडून देऊ.'

प्रकरण मिटलं तरी पॅंकोची खूपच नाचक्की झाली. फेअर-चाइल्डच्या जगात सगळ्यांचं हित सारखंच बघणं आवश्यक होतं.




पुढे काहीही सापडेनासं झालं की उघड उघड पँकोचं नाव घेतलं जाई. त्याला सतत शिव्याशाप ऐकावे लागले. दर खेपेला त्याचा दोष असायचाच असं नाही. इन्शार्ते हा एकमेव मुलगा त्याच्याशी प्रेमानं बोलायचा. त्यामुळे पँको पूर्णपणे एकाकी पडला नाही, हे त्याचं सुदैव.

' युरुग्वेचं सी–४७ हेच विमान फक्त शोध घेत आहे. ' ही दुःखद वार्ता त्यांना रेडिओवरून ऐकायला मिळाली. त्यांना दिसलेला क्रॉस अर्जेटिनाच्या तुकडीनं पूर्वीच केला होता हे समजल्यामुळे हेलिकॉप्टर्स माघारी गेली. दुसऱ्या दिवशी विमानात पुन्हा बिघाड झाल्याची बातमी रेडिओनं दिली.

कॅनेसा आणि पेरॅडो जाऊन आठवडा होत आला होता आणि पुढच्या आठवड्यात नाताळ ! नाताळचा दिवस पर्वतावरच काढावा लागणार अशी लक्षणं होती. त्यामुळे मुलांना अतीव दुःख होत होतं. फिटो नव्या मोहिमेचा विचार करू लागला. डॅनियलचं प्रेत आणताना त्याला जो अनुभव आला होता त्यावरून कॅनेसा–पेरॅडो जोडीला कितपत यश मिळणार ही शंकाच होती. मग नव्या तुकडीनं तरी कोणत्या आशेवर निघावं ?

तो दिवस सर्वांनी मूकपणे घालवला. रोजचे सर्व कार्यक्रम गुपचूप उरकून संध्याकाळी ते विमानात जाऊन पडले. रात्र तर अधिकच खायला उठली. बिचारी निश्चलपणे पडून होती. दोघांच्या रक्षणासाठी काही मुलांनी मनात प्रार्थना सुरू केली. लिलियानानं मुलांना लिहिलेलं पत्र आजच जेव्हियरला सापडलं होतं. ते पुनःपुन्हा वाचून तो हुंदके देऊ लागला.

दुपारी तीन-चारच्या दरम्यान मुलं विमानातून बाहेर आली की त्यांचा संध्याकाळपर्यंतचा वेळ आनंदात जायचा. मांस कापणे, थट्टाविनोद, पाणी वितळणे इ. गोष्टी चालू असायच्या. तेवढा काळ त्यांना परिस्थितीचा विसर पडे. सूर्य पश्चिमेकडे कलल्यावर ते पर्वत थोडा चढून जात. वर बसून मजेत धूम्रपान करीत. दिवसाच्या या वेळात सगळे जास्तीत जास्त सुखी असत.

घर आणि कुटुंब हे विषय सोडून जगातल्या कुठल्याही विषयावर गप्पाटप्पा चालत; पण २० डिसेंबरच्या त्या संध्याकाळी, पूर्वी थाटात साजरे केलेले ' ख्रिस्‌मस ' त्यांना आठवल्यावाचून राहिले नाहीत. फिटो, एड्युअर्डो आणि डॅनियल यांना सर्वाधिक दुःख झालं. आपल्यावाचून १९७२ चा नाताळ तिकडे साजरा होणार ! ही कल्पनाच असह्य झाली. प्रथमच त्यांच्या गालांवरून उष्ण अश्रू ओघळू लागले–अगदी फिटोच्यासुद्धा. ◻

: ५ :

१२ डिसेंबरला सी–४७ च्या वैमानिकांची श्री. पेझ यांनी गाठ घेतली. अँडीजवरून जाताना थंड वातावरणामुळे विमानाची इंजिनं नादुरुस्त होत असावीत असं त्यानं सांगितलं. सर्वांत उंचावरच्या शिखरांचं निरीक्षण करण्यासाठी हेलिकॉप्टरचा काहीच उपयोग नव्हता.

श्री. पेझ व्हिलॅरोंचा उत्साह अपवादात्मक होता. शोध अविरत चालू राहावा यासाठी बारिकबारिक गोष्टींचा विचार करून ते अखंड परिश्रम घेत होते. विमानातही आवश्यक त्या दुरुस्त्या तोवर झाल्या. प्लँकन मार्गाजवळ शोध घ्यायचा होता. दुसरं लक्ष्य होतं टिंग्विरिरिका ज्वालामुखी. युरुग्वे आणि चिली यांमध्ये रेडिओद्वारा संपर्क चालूच होता. प्रत्येक नवीन वृत्त त्यामुळे चिंताग्रस्त पालकांना मिळत असे.

बर्फात क्रॉस दिसल्याची वार्ता वृत्तपत्रात आणि रेडिओवरून ठळकपणे प्रसृत झाली. मुलंवेड्या पालकांच्या आशा लगेच पालवल्या. त्याच सुमारास अर्जेटिनाच्या विमानदलानंही मदतीचा हात पुढे केला पुढे क्रॉसविषयी भ्रमनिरास झाला. आशा-निराशेचा खेळ खरोखर दुर्दैवी होता. पँकोची आई तर भलतीच आजारी पडली.

१८ डिसेंबरला पेझनी एक विमान भाड्यानं घेतलं. टिंग्विरिरिकाच्या आसपास शोध घेण्याचा त्यांचा मानस होता. चिलीतल्या ' अँडीज सुटका दला'चे प्रमुख ' क्लॉडिओ ल्युसेरो ' हे देखील बरोबर होते. वरून निरीक्षण करीत असताना ल्युसेरोना अचानक खाली मानवी पावलांचे ठसे दिसले. दुसरी चक्कर मारताना पेझनाही ते दिसले. त्यांनी ल्युसेरोना विचारलं, ' तुमचं याबाबत काय मत आहे ?'

' ते नक्कीच माणसाच्या पावलांचे ठसे आहेत. '

' मुलांचे ?'

' अशक्य. बहुधा मेंढपाळांचे असावेत. '

' इतक्या आत निष्कारण ते कशाला जातील ?',

ल्युसेरोंनी नुसतेच खांदे उडवले.

क्रॉसबद्दलच्या निराशेनंतर पेझ मुलांच्या जीविताविषयी साशंकच झाले होते; पण निदान त्यांची प्रेतं तरी कुणा चोरांच्या हाती लागण्याआधी मिळावीत अशी त्यांची इच्छा होती. काही झालं तरी अपघाताला दोन महिने होऊन गेले होते.

आर्मीकमांडर कर्नल मॉरेल पेझना म्हणाले, ' तुम्ही नाताळसाठी तुमच्या देशाला जाऊन या. मी त्या विभागावरून गस्त घालायची व्यवस्था करतो. काही तपास लागला तर ठीकच, नाही तर तुम्ही पुन्हा परत आल्यावर आपण पुन्हा सुरुवात करू.

ही गोष्ट मान्य करून पेझ इतर चार जणांसह मॉन्टेव्हिडिओला परतले. [ क्रमशः ]


पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# उत्तर नसलेला प्रश्न

पृष्ठ १४ वरून

' आता येथेच होता सर, बाहेर... ' त्यालाही निश्चित माहीत नव्हते.

' मोहनची पेटी कोणती ? '

मला त्याने मोहनची पेटी दाखवली. मी कसलाही विचार न करता ती कॉटखालून खस्‌कन् बाहेर ओढली. कुलूप लहान आकाराचे होते. तीन-चार झटक्यात ते तोंड आ करून बाजूला पडले. मी पेटी उघडली. आतील सर्व साहित्य चाळून पाहिले.

मोहनचा जोडीदार भांबावून गेला होता. हे सर्व का व कशासाठी चालले आहे याचा त्याला अंदाज येईना. मला पेटीत पैसे सापडले नाहीत. पुस्तके, वह्या पाहिल्या; कोठेही पैसे नव्हते. त्याने खर्चले असावेत, अथवा त्याच्यावर विनाकारण तोहमत आली असावी. असंच असतं ! मोहनचे नाव काळ्या यादीत होते ना ! तळात वर्तमानपत्राच्या घडीखाली झाकून ठेवलेली शेवटची वही तपासावयाची राहिली होती. ती तपासली की संपले. ती वही मी घेतली, उलटी-पालटी केली, त्या वहीत पैसे सापडले नाहीत, पण जे काही सापडले ते पाहून मात्र मी थंडगार झालो.

त्या वहीत मोहनच्या नावावर आलेली तीन-चार इन्लॅंडस् होती व एक पत्र त्याने स्वत: लिहिलेले होते; पण ते अद्यापपर्यंत पोस्ट केले नव्हते. कदाचित् त्याला तशी संधी मिळाली नसावी. त्याच्या नावावर आलेली पत्रे त्याच्यापर्यंत कशी पोहोचली ? वास्तविक नियमाप्रमाणे ती प्रथम कार्यालयात यायला हवी होती. मोहनने शिपाई किंवा पोस्टमनला फितवला असणार हे नक्कीच. त्याशिवाय त्याला ही पत्रे मिळाली नाहीत. मी ती पत्रे ताब्यात घेतली व एक सरसर नजर टाकून पाहिली. आश्चर्याला सीमा नव्हती.

मोहनला साध्या विषयावर चार ओळी निबंध सुद्धा लिहिता येत नव्हता. कल्पनाशक्तीचा वापर करण्याची सवय नाही हे समर्पक उत्तर याला आहे; परंतु ज्याला ' बागेत एक तास ' हा निबंध लिहिता येत नाही, त्याने दोन पाने भरगच्च सुंदर भाषेत प्रेम-पत्र कसं लिहिलं ? मोहन कुठे वाहत चालला होता ? तो वाहत एवढा पुढे गेला होता की त्याच्या जीवनाचं हे शीड नसलेलं तारू कोणत्या खडकावर फुटणार तो खडक आणि तो वेळ हेच ठरायचं बाकी राहिलं होतं.

मी या पत्रांची वाच्यता कोणाजवळ केली नाही. ती सर्व पत्रे त्याच्या पालकांना दाखविण्यासाठी जपून ठेवली. ती मुलगीही त्याच्याच वयाची व सुखवस्तू कुटुंबातील असावी असा तर्क मी बांधला.

मोहनला बोलावून याबद्दल खुलासा विचारला तर त्याचा नेहमीचा सोयिस्कर पवित्रा– मौन, स्तब्ध राहणे ! मी चिडलो. म्हटले,

' मोहन, या वयात तुला हे शोभत नाही. तुला शाळेतील विषयात गोडी नाही, अन् ही पत्रातील सुंदर भाषा कशी येते ?' मोहनने मान खाली घातली.

' मोहन, तू मोठ्या घरात जन्मलास, हे तुझं नशीब! तुला पैशाची कसली चिंता नाही. या परिस्थितीचा फायदा घ्यायचा, भरपूर शिकायचं सोडून दिलंस आणि हे असले धंदे ?' मी ती सारी पत्रे त्याच्या तोंडासमोर नाचवीत चिडीनं म्हणालो तरी तो गप्प उभा ! ह्यांना हे गप्प उभे राहण्याचं तंत्र बरं जमतं.

मोहन असे का वागत होता ?

सर्व दुर्गुण त्याच्या ठिकाणीच कसे एकवटले होते ! पुढेही रोज त्यांच्या तक्रारी येतच राहिल्या. समजाविणे, भीति घालणे, शिक्षा करणे, अबोला धरणे इ. सर्व प्रकारांचा वापर करूनही त्याचे वर्तन सुधारले नाही किंवा सुधारण्याची चिन्हेही दिसेनात.

तो एकटा एकटा राहू लागला. इतर मुलांत मिसळत नसे. एवढे मात्र त्याच्या बाबतीत दिसून आले की, तो इतर मुलांना कसलाही त्रास देत नव्हता. स्वत:चे दुर्गुण त्याने स्वत:पुरतेच मर्यादित ठेवले होते. त्याचा तो इतरांना उपद्रव देत नव्हता की, तसली दीक्षा तो इतर मुलांना पढवीत नव्हता. ' हेही नसे थोडके ' यावरच मी समाधान मानले.

एके दिवशी दिनकर आला. अचानक संध्याकाळच्या गाडीने उतरला. फार दिवसांनी–दिवसांनी कसले वर्षांनी– भेटला. मला आनंद झाला. मी व त्याने आयुष्यातला बराच काळ एकत्र काढला होता. काही वर्ष शिक्षणाच्या निमित्ताने व काही वर्ष नोकरीच्या. त्या दिवसांच्या आठवणीत मी व तो दोघेही रमलो होतो. चहा दोन वेळा झाला तरीही आमचे बोलणे संपेना. त्याच वेळी मोहन आला. त्याला गावी जाण्यासाठी परवानगी



हवी होती. त्याने दिलेला अर्ज वाचला व मी मनाशी हसलो. मी म्हटले,

'तुझ्या पालकांचे तसे पत्र नाही. पत्र आण त्याशिवाय तुला गावी जाण्याची परवानगी देता येणार नाही.''

'माझी आई फार आजारी आहे, असा निरोप आला आहे.' तो तोंडात पुटपुटला.

'केवळ निरोप काय कामाचा बेटा, तसं लेखी पत्र कुठं आहे ?'

आई आजारी आहे ही शुद्ध थाप आहे हे मी ओळखले. आमचे लेखी पत्र असल्याशिवाय त्याला गावी जाण्याची परवानगी देऊ नये असे त्याच्या चुलत्यांनीच स्वतः सांगितले होते.

'उद्या पाहू काय करायचं ते, जा तू.' आणि त्याचा अर्ज मी ठेवून घेतला. मोहन गेल्यानंतर दिनकर माझ्याकडे पाहून हसला व म्हणाला,

'हे चिरंजीव इथे कसे ?'

'तू याला ओळखतोस ?'

'अगदी चांगला, यालाच काय पण याच्या सगळ्या फॅमिलीला मी चांगला ओळखून आहे.' दिनकरच्या आवाजात मला थोडासा तिरस्काराचा वास जाणवला.

मी मोहनचा सर्व इतिहास त्याला थोडक्यात सांगितला व निराश स्वरात म्हटले,

'हा पोरगा अगदीच कामातून गेल्यासारखाच आहे. कसं होणार याचं ? आणि हा असं का वागतो हा प्रश्नही अनुत्तरितच आहे.' दिनकर हसला. त्याच्या हसण्यात सुद्धा मला वेगळाच भाव दिसला.

'अं हं. तू म्हणतोस तसा ह्याचा प्रश्न अनुत्तरित नाही. तुला उत्तर माहीत नाही असं म्हणता येईल; पण. हा उत्तर नसलेला प्रश्न मुळीच नाही.'

'ते कसं काय ?' मी उत्सुकतेनं विचारलं.

'हा असं का वागतो ह्या प्रश्नाचं उत्तर तुला मी सांगतो आणि असाच वागणार हे ही पक्कं लक्षात ठेव ! तू कितीही डोकेफोड केलीस तरी याच्या वर्तनात काडीमात्र सुधारणा होणार नाही !'

'म्हणजे ?' दिनकर आवेशाने बोलत होता.

'त्याचं असं आहे.' दिनकर सावरून बसला. तो काही तरी विशेष सांगू इच्छित होता. त्याच्या डोळ्यांत चमक जाणवली, चीड डोकावली. तो पुढे सांगू लागला. 'मोहनच्या वागण्यात त्याची स्वतःची चूक अथवा दोष मी तरी समजत नाही. मुलं परिस्थितीने घडविली जातात. मुलांना सुधारण्याचा किंवा घडविण्याचा म्हण हवं तर मक्ता केवळ शाळांनीच घेतलेला नाही. पालकांनी मुलं बिघडवायची अन् तुम्हाला सुधारा म्हणून इथे आणून सोडायचं हा कोठला न्याय ?'

'तुला काय म्हणायचं आहे ते स्पष्ट बोल...'

'अगदी स्पष्ट आहे. या मुलाच्या घरचं सर्व वातावरणच दूषित आहे. याच्या एका चुलत्याला तमाशाचा नाद नव्हे वेड आहे. तमाशाचे फड हा उघडपणे रोज रात्री माळचातील बंगल्यावर उभा करतो, इतकंच नव्हे कधी कधी या मुलालाही घेऊन जातो. याची बहीण आपल्या चिठ्ठया ह्याच्याकरवी योग्य त्या ठिकाणी पोहचविते. मग याला प्रेम-पत्र का लिहिता येऊ नये ? तूच सांग, अशा दूषित हवेत वाढणारा मुलगा निकोप वाढेल कसा ? अरे बाबा, ह्याला सुधारण्याअगोदर याच्या घरातील मोठ्यांना नैतिकतेचे पाठ शिकवावे लागतील, मग याचं पाहता येईल.'

मी एक विषण्ण निश्वास सोडला अन् सुन्न नजरेने आढयाकडे एकटक पहात राहिलो. □ □




# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

## २०-९-७५ ते २६-९-७५

### भारताच्या सामर्थ्याचा जगाला आगळा प्रत्यय

पाकिस्तान व काही पाश्चिमात्य राष्ट्रे भारताला कुठे ना कुठे अपशकून करण्यासाठी टपून बसलेली असतानाच गेले काही दिवस ही राष्ट्रे भारतविरोधी प्रचाराची आघाडी उघडून राहिली आहेत; पण उद्याच मिथुनराशीत प्रवेश करणारा मंगळ व कन्याराशीत सध्याच वास करीत असलेला रवी आपले प्रखर स्वरूप याच वेळी प्रकट करणार असून या विरोधकांना जाणवेल असा भारताच्या राष्ट्रवादाचा, त्याचबरोबर सामर्थ्याचा प्रत्यय जगाला आणून देणार आहे. पाकिस्तानला पुन्हा नाकधुऱ्या काढण्याची पाळी आली तर आश्चर्य वाटू नये. आर्थिक बाबतीत अमेरिका भारताला अनुकूल असा बदल आपल्या धोरणात करील असे मी काही दिवसांपूर्वीच सूचित केले होते त्याचा प्रत्यय आता आला आहेच. अर्थमंत्री श्री. सुब्रह्मण्यम् व परराष्ट्रमंत्री श्री यशवंतराव चव्हाण यांनी गेल्याच आठवड्यात अमेरिकेच्या दौऱ्यावरून परतल्यावर जी निवेदने केली त्याचा माझ्या ज्योतिर्षी अंदाजाशी बरोबर सूर जुळला आहे. आजच्या परिस्थितीला अनुसरून विरोधी पक्षनेते स्वतःच्या धोरणात समंजस असा बदल करण्याची चिन्हे या आठवड्यात अधिक स्पष्ट दिसू लागतील. तसेच महाराष्ट्र मंत्रिमंडळ मध्यवर्ती मंत्रिमंडळ आणि काँग्रेससंघटना यामध्ये बदल होण्याची स्पष्ट चिन्हे या वेळी दिसू लागतील. आर्थिक क्षेत्रात फारसा बदल नाही.

### मेष : पैसा जपून वापरा

या आठवड्याच्या शेवटी मंगळ तिसरा होत आहे ही तुमच्या बाबतीत महत्त्वाची ठरणारी घटना आहे; पण त्याचबरोबर गुरू बारावा झाला आहे याकडे दुर्लक्षून मुळीच चालणार नाही. या आठवड्यात सोमवार व गुरुवार हे दिवस तुम्हाला पुष्कळच अनुकूल आहेत. एखादा छोटा उद्योग–लघुउद्योग, व्यापार–दुकान वगैरे सुरू करायला हरकत नाही. यश येऊ शकेल. या आठवड्यात पैशाच्या व्यवहारात फार काळजीपूर्वक वागणे आवश्यक आहे. कुणाला उसने पैसे देऊ नका व कुणाकडून उसने पैसे घेऊ नका. खरेदीविक्री याचा ज्यांचा धंदा असेल त्यांनी असा व्यवहार या आठवड्यापुरता टाळावा. विवाहविषयक बोलणे करायला हरकत नाही. पण विवाह मात्र या आठवड्यात करू नका. पत्रव्यवहारात भाषा संयमी ठेवा. नोकरीच्या बाबतीत कार्यक्षमता वाढवणे आवश्यक आहे. कामाची हेळसांड अगर चुकारपणा करू नका. बेकारांचा प्रश्न थोडा लांबणीवर पडेल. विद्यार्थी-विद्यार्थिनींनी अभ्यासाकडे विशेष लक्ष द्यावे. महिलांना संसारात पैशाची अडचण भासली तरी थोडा त्रास होऊन पैसा मिळेल. आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे.

### वृषभ : पैसा मिळू लागेल

पैसा आणि परिस्थिती यामुळे तुमच्या भोवती निर्माण झालेली कोंडी फुटण्याची प्रक्रिया याच आठवड्यापासून सुरू होईल. अडचणीचे केवढेही मोठे डोंगर असोत त्याची उकल होऊ लागणार आहे. गुरु अकरावा झाला असल्यामुळे तुमच्या कल्पकतेला तेज चढेल. प्रतिभा जागी होऊन अत्यंत परिणामकारक असे लेखन तुमच्या हातून होईल. आठवड्याच्या शेवटी मंगळ तुमची रास सोडून मिथुन राशीत प्रवेश करीत आहे. तो आर्थिक अडचणी बऱ्याच प्रमाणात कमी करील. पैसे मिळतील की नाही, येणे वसूल होईल की नाही या शंकांनी तुमच्या मनात जे घर केले आहे त्या शंका अवास्तव आहेत याची खात्री पटेल. पत्रव्यवहार, महत्त्वाची बोलणी यात यश येईल. रविवार व बुधवार हे दोन दिवस अतिशय अनुकूल आहेत. कोर्टकचेरीची, व्यापारविषयक बोलणी करायला हरकत नाही. विद्यार्थी–विद्यार्थिनींनी जागरण करू नये. नोकरीच्या बाबतीत फारसा त्रास नाही. बदलीची साशंकता मनात थैमान घालू लागल; पण भीती बाळगण्याचे कारण नाही. महिलांना कौटुंबिक व्यवस्थेत महत्त्वाचा हक्क मिळू शकेल. माहेरचे बोलावणे येईल.

### मिथुन : नोकरीत यश

बाराव्या मंगळाची उग्र कारकीर्द या आठवड्याच्या शेवटी संपून तुमच्याकरिता त्याच्या सामर्थ्याची कारकीर्द सुरू होत आहे. तोपर्यंत हाताखालच्या माणसांना दुखवू नका व नोकरवर्गाला चुचकारून घ्या. नोकरीच्या दृष्टीने महत्त्वाची पावले पडणार आहेत बोलणी करायची असतील तर त्याला अनुकूलता आहे. लेखक, पत्रकार, वाणिज्यपदवीधर, शेतीपदवीधर, वकील यांच्या दृष्टीनेदेखील आठवडा महत्त्वाचा ठरणार आहे. चालू नोकरीत बढती बदलीचा विचार होऊ लागेल. वरिष्ठांची अगर मालकांची दूर गेलेली मर्जी याच आठवड्यापासून पुन्हा तुमच्यावर बसू लागेल. रविवार, गुरुवार व शुक्रवार हे या आठवड्यातील दिवस अत्यंत अनुकूल आहेत. काही महत्त्वाचे घडावे. परदेशी प्रवासाचा बेत आखत असाल तर त्याला अनुकूल साद मिळणार आहे. इष्टमित्रांची व नातेवाइकांची मदत होईल. व्यवसायाबाबत विशेष बदल दिसत नाही मात्र भागीदारीत काळजी घ्यावी. भागीदारीचा नवा करार वगैरे काही करू नये. विद्यार्थीविद्यार्थिनींनी प्रवास टाळावा. महिलांना प्रतिष्ठा लाभेल. त्यांचा गौरव होईल. नोकरीत त्यांना महत्त्वाचे स्थान लाभेल.

### कर्क : पैसा मिळण्याचा योग

मंगळ अकरावा आहे तर शनि पहिला आहे. या वेळी तुम्ही खरोखर असमाधानी असावे असे काहीच नाही. लॉटरी अगर रेसची तुम्हाला सवय असेल तर या आठवड्यात तुम्ही भाग घ्यावा. तुमचे नशीब उघडेल अशी ग्रहांची अनुकूलता आहे. शनिवार, बुधवार व गुरुवार मनोरथ पूर्ण होऊ शकतील. स्वतंत्र धंदा सुरू करायचा तुमचा मानस असेल तर तो अवश्य करा. मात्र नोकरी सोडून करू नका. कापडव्यापार, प्लॅस्टिक, फळे, आम्ल पदार्थ, नारळ, सुगंधी तेले इत्यादींचा व्यापार वा उत्पादन करायला हरकत नाही. शेतीची जमीन खरेदी करायला अनुकूलता आहे. शेतीचा व्यवसाय देखील उत्तम चालेल. पदवी-

धर बेकारांना स्वतःचा व्यवसाय करण्यासाठी मदत मिळेल. चालू नोकरीत बढती व बदलीचा योग आहे. विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या गुणांना संधी मिळेल. महिलांना नवा दागिना अगर नवे वस्त्र मिळेल. नोकरीत उदय होईल.

### सिंह : राजकारणात गाजाल

या वेळी तरी तुमच्या प्रगतीची सूत्रे रविच्या हाती आहेत. त्यामुळे तुमचा जो मूळ पिंड राजकारणाचा त्यात तुमचे मनोरथ आणि महत्त्वाकांक्षा सफल होण्याची शक्यता नाकारू नका. तुमची उपेक्षा तर संपेलच; पण वरिष्ठ नेत्यांना व कनिष्ठ नेत्यांना सल्ला देण्याची जबाबदारी तुम्हाला स्वीकारावी लागेल. तुमचे नाव या आठवड्यात गाजणार आहे. सोमवारी एक महत्त्वाची घटना घडणार असून तुमची प्रतिष्ठा उंचावणार आहे. रविवार, बुधवार व शुक्रवार नोकरीच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. चालू नोकरीत वरिष्ठांच्या अगर मालकाच्या मर्जीने तुमचा फायदा होणार आहे. बदली तहकूब होईल. नोकरीतील त्रास देखील कमी होईल. बेकारांना नोकरीत अग्रक्रम मिळेल. नोकरी दर्जा वाढवणारी ठरेल. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्याचा विचार चालू होईल. विद्यार्थिनींना कलाक्षेत्रात प्रोत्साहन मिळेल. महिलांना सार्वजनिक काम करणे प्रतिष्ठेचे ठरेल. नोकरीत बदली होईल.


पूर्णिया
अनिल अवचट
किंमत : सहा रुपये

शनवारवाड्यातील
शमादान
ब. मो. पुरंदरे
किंमत : साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन
पुणे ४११ ०३०


### कन्या : नोकरीत स्थैर्य

या आठवड्याच्या शेवटी मंगळ भाग्यस्थानी येत आहे. तो तुमचे नोकरीतील स्थान उंचावल्याशिवाय राहणार नाही. तुम्हाला स्वतंत्र दर्जा राहील. तुमच्या कामाचे चीज होईल व सर्वसामान्य लोकांवर तुमचा प्रभाव पडेल असेच काम तुमच्याकडे येईल. बेकारांना इतके दिवस नुसतीच आश्वासने मिळत होती. या वेळी मात्र नक्कीच नोकरी मिळणार आहे. बँक, कोर्ट, विद्यालये, बांधकामखाते, संशोधनविभाग, रेशनिंग अशा विभागात नोकरीचे प्रयत्न करावेत. वृत्तपत्रकार, लेखक व तत्त्वज्ञानी यांना देखील आठवडा चांगला जाईल. तब्येत जरा नरमगरम राहाणार आहे. अनेक दिवस न भेटलेली आप्तइष्ट मंडळी या वेळी भेटतील. पत्रव्यवहारांत सफलता लाभेल. राजकीय नेत्यांत व वरिष्ठ क्षेत्रात तुमची प्रतिष्ठा उंचावेल. विद्यार्थी परीक्षेत या वेळी नेत्रदीपक यश मिळवतील. त्यांची मुलाखत प्रसिद्ध होईल. शुक्रवार उपास फलदायी ठरावा. कोणतेही काम त्या दिवशी करावे. महिलांना समाधानकारक असे काही तरी घडेल. पैसा मिळेल.

### तूळ : अकल्पित लाभ

रवि व मंगळ हे दोन ग्रह या वेळी तुमच्यावर तेवढेसे खूष नाहीत. त्यामुळे त्यांच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. नोकरीत काळजी करावी लागेल. सरकारी व वरिष्ठ यांच्याबरोबर मतभेद होतील व ते काही वेळा ताणले जातील. बदलीच्या फंदात तर अजिबात पडू नका. बेकारांना याच आठवड्यांत नोकरीचे मिळालेले आश्वासन प्रत्यक्षात उतरण्याची शक्यता कमी आहे. मात्र अनेकांना या वेळी उद्योगात लक्ष घालता येईल. स्वतःचा उद्योग सुधारता येईल. फळे, मिठाई कागद व सौंदर्यप्रसाधने असा कोणताही उद्योग सुरू करता येईल. मदत मिळेल. या वेळच्या ग्रहांचा एक विशेष म्हणजे अकल्पित अर्थलाभ होय. व्यापारीवर्गाला पडून राहिलेल्या मालाचा एकदम नफा होईल किंवा शेअर्समध्ये भरमसाठ वाढ होऊन पैसा मिळेल. रेस व लॉटरी यामुळे कित्येकांचे नशीब उघडेल. विद्यार्थीविद्यार्थिनींना शिक्षणाबरोबरच पैसे मिळतील. गरज भागेल. महिलांना स्थावर व इतर प्राप्ती होईल. वारसा हक्क मिळेल. संसारात महत्त्व प्राप्त होईल.

### वृश्चिक : प्रगतीची सुरुवात

आठवा मंगळ तसा चांगला नाही असे अनेकांचे मत आहे; पण माझ्या मते हा मंगळ धनलाभकारक आहे. मिथुन या बुद्धिवादी राशीत हा मंगळ या आठवड्याच्या शेवटी येणार आहे व त्याची पूर्वचिन्हे याच आठवड्यात दिसू लागतील. रविवार, सोमवार व शुक्रवार या दिवशी शेती-खते, जमीन-जुमला, घर व इतर स्थावर प्रॉपर्टी याबाबतीत अनुकूल घटना घडतील. नोकरीत अडचणीच्या ठिकाणी झालेली बदली आता तहकूब होऊन सोयीच्या ठिकाणी बदली होईल. तुमचा जर एखादा वाद वा दावा कोर्टात चालू असेल तर तो तडजोडीने मिटेल. पत्रव्यवहार करायला हा आठवडा उत्तम आहे. विदेशी जाण्यासाठी तुमची खूप दिवस खटपट चालू होती तिला अपेक्षेचे फळ या वेळी येणार आहे. रेसमध्ये तुम्ही नेहमीच भाग घेत असाल; पण या वेळी मात्र गेलेला पैसा परत मिळून चार पैसे शिल्लक राहतील. दागदागिने, नवी भांडीकुंडी, नवे कापड खरेदी करण्याला अनुकूल आहे. विद्यार्थी व विद्यार्थिनींना शिकतानाच मिळवण्याची संधी मिळेल. महिलांना स्थावरात स्वतःचा वाटा मागता येईल. संसारात सामंजस्य व शांतता अनुभवता येईल.

### धनु : कौटुंबिक मतभेद टाळा

या आठवड्याच्या शेवटी मंगळ सातवा होत आहे. तो तेवढासा चांगला नाही. या मंगळाची उग्र वृत्ती याच आठवड्यापासून दिसू लागेल. घरात काही तरी सारखे खटकत राहील. भाऊ-भाऊ व पतिपत्नी यांच्यात सतत मतभेद होत राहतील. मात्र ही भांडणे सामोपचाराने मिटवता येतील. तुमचे मानसिक स्वास्थ्य बिघडण्याची चिन्हे दिसू लागतील. देण्याघेण्याचे वाद निर्माण होणार असून पैसा अपुरा पडला नाही तरी दगदग होणार आहे. शारीरिक अवस्था तशी दुबळीच राहील. हातपाय दुखणे, अंग दुखणे वगैरे वगैरे; पण तरीदेखील सुट्टी अगर

विश्रांती घेण्याची गरज भासणार नाही. पैशाची चणचण असली तरी प्रतिष्ठेला तडा जाईल असे काही घडणार नाही. रविवार, बुधवार व शुक्रवार अनुकूल आहेत. नवीन ओळखी होतील. नवे संबंध प्रस्थापित होतील. नोकरीत सहानुभूतीचे वातावरण राहील. कामाची नवी जबाबदारी अंगावर पडेल. विद्यार्थी-विद्यार्थिनींना नव्या क्षेत्रात संधी मिळेल. महिलांना नोकरीत व लघुउद्योगात काही प्रगती करता येईल.

**मकर : मनोरथ पूर्ण होईल**

रवी व शनी तसे तुम्हाला या वेळी फार अनुकूल नाहीत; पण ते तुमचे नुकसान मात्र काही करणार नाहीत. मन:स्थिती साशंक ठेवील. मन धाकधूक राहील. नसलेल्या एखाद्या घटनेची भीती मनात राहील; पण प्रत्यक्षात मात्र तुमचे सारे ठाकठीकच चालेल. या आठवड्यात तुम्ही काही नवे संकल्प करायला हरकत नाही. नोकरी अगर उद्योग याबाबतीत नव्या पर्वाची नांदी या वेळी होऊ शकेल. अडचणी दूर होणार असून पाऊल पुढे पडेल. वरिष्ठ लोक तुमच्या कामावर खूष राहतील. तुम्ही एखादी योजना त्यांच्या समोर मांडली तर ती लगेच त्यांना पसंत पडेल. तुमची आर्थिक बाजू बरीच भक्कम होईल. अनेक आवडती कामे पैशाकरिता अडून राहिली होती त्याला चालना मिळू शकेल. शनिवारी राजकारणी व नेतृत्व करणारी व्यक्ती तुम्हाला मार्गदर्शन करील. तिचे सहाय्य होईल. बुधवारी प्रवास घडेल. विज्ञानपदवीधर व कायदेतज्ज्ञ यांना स्वतंत्र धंदा अगर नोकरी मिळू शकेल. विद्यार्थी व विद्यार्थिनींना अभ्यासासाठी परिश्रम घ्यावे लागतील. महिलांना प्रशासनात मोठे स्थान मिळेल. सार्वजनिक कामात नेतृत्व लाभेल. नोकरीत बदली होईल.

**कुंभ : राजकीय स्थित्यंतराची चाहूल**

नाराजी व असफलता यांनी तुमचे कोंदटलेले मन या आठवड्यात प्रकाशकिरणे दिसून बरेच मोकळे होऊ लागणार आहे. राजकीय क्षेत्रातील तुमचे अनुकूल स्थित्यंतर याच वेळी दृष्टिपथात येऊ लागेल. गेल्या काही दिवसांत तुम्ही घेतलेल्या गाठीभेटींचे फलितसाफल्याच्या रूपाने दृष्टिपथात येऊ लागणार असून तुमच्या मनाला प्रसन्नता येईल. रविवार, सोमवार व गुरुवार विशेष महत्त्वाचे ठरावेत. महत्त्वपूर्ण घटना घडतील. व्यापारीवर्गाला उत्साहवर्धक असे वातावरण राहील. नियम व कायदे पाळण्याकडे त्यांची वृत्ती राहून गिऱ्हाइकांच्या हिताचे काही करावे असे त्यांना वाटू लागेल. लोखंडी उत्पादन, पोलाद, तेलबिया यांचे वायदे व शेअर्स चार पैसे मिळवून देतील. कापडव्यापाऱ्यांना धाडस करायला हरकत नाही; पण मालाचा विशेष उठाव या वेळी तरी चटकन होणे कठीण आहे. तब्येत सुधारेल. अनेक अडचणींवर मात करून पुढे जाऊ शकाल. नोकरीत वरिष्ठांची ब्याद बदलून जाऊन त्यांचे काही अधिकार तुमच्याकडे येतील. आमदार, खासदार वगैरे राजकीय मंडळींना नवे काही तरी गवसेल. विद्यार्थ्यांना पैशाची मदत मिळेल. महिलांना नोकरीत स्वत:चे गुण दाखवता येतील. त्या गुणांना वाव मिळणार असून कौतुक होईल.

**मीन : उपासनेचे फळ मिळेल**

गुरु पहिला व शनी पाचवा ही तुमच्याबाबतीत फारच अनुकूल ग्रहस्थिती म्हणावी लागेल. गुरु-शनीचा हा त्रिकोण काही तरी भले घडवील व तुमचे मनोरथ पूर्ण करील यात शंकाच नाही. प्रकाशनव्यवसाय अगर स्वत:चा साप्ताहिक, मासिक काढण्याचा उद्योग तुम्हाला सुरू करता येईल. नोकरीची परिस्थिती सुधारणार आहे. नव्या अगर चालू नोकरीत बदल अपेक्षेप्रमाणे होईल. आर्थिक स्थिती सुधारावी, बढती-प्रमोशन मिळावे अशी काही तरी घटना घडेल. इंटरव्ह्यू होऊन ज्यांना अजून नोकरी मिळाली नव्हती त्यांना या आठवड्यात नोकरी मिळेल. स्वतंत्र उद्योगाला प्रोत्साहन व मदत मिळू शकेल. मात्र नोकरदारांना कामाच्याबाबतीत बरेच काटेकोर राहावे लागेल. एखादे जुने प्रकरण उत्पन्न होऊन मन अस्वस्थ होऊन जाईल. उपासना करा. गुरु तुमचा त्राता आहे. आध्यात्मिक प्रगती चांगली होईल. मदत मिळेल. विद्यार्थीवर्गाला नोकरी करून शिक्षण घेता येईल. तांत्रिक शिक्षणाची इच्छा दृष्टिपथात येईल. महिलांना महत्त्व येईल. सार्वजनिक अगर राजकीय क्षेत्रात पुढारीपण मिळेल. अनुयायी सहकार्य देतील. लेखिकांना उच्च पद मिळेल. □ □



# पॅपिलॉन पुस्तक योजना

पॅपिलॉन पुस्तक योजना

## योजनेचे स्वरूप

या योजनेत दरमहा एक पुस्तक याप्रमाणे एकूण पाच पुस्तके प्रकाशित होतील.

योजनेतील प्रत्येक पुस्तकाची दर्शनी किंमत सुमारे १५ ते २० रुपये राहील.

आज नोंदणीशुल्क दहा रुपये भरून पॅपिलॉन पुस्तकयोजनेत सहभागी होणाऱ्या व्यक्तीस मात्र यातील प्रत्येक पुस्तक दरमहा फक्त पाच रुपयात मिळू शकेल. पाठवणी, टपाल इ. खर्च मात्र ग्राहकाकडे राहील.

## योजनेसंबंधी आणखी थोडे

योजनेतील पहिले पुस्तक पॅपिलॉन हे ५ ऑक्टोबर ७५ ला प्रकाशित होईल.

पूर्वसूचना मिळाल्यावर ग्राहकाने विशिष्ट मुदतीत पाच रुपये भरून आपले पुस्तक कार्यालयातून घेऊन जावे किंवा ५ रुपये + टपाल–पाठवणीखर्च इतक्या रकमेची त्याला व्ही. पी. केली जाईल. ती त्याने सोडवून घ्यावी.

व्यक्तिगत ग्रंथसंग्रह हा योजनेचा मूळ हेतु असल्याने ग्रंथ–विक्रेत्यांना या योजनेत सहभागी होता येणार नाही.

ज्या ग्राहकास दरमहा पाच रुपये भरणे गैरसोयीचे वा त्रासाचे असेल अशांनी एकरकमी ३५ रुपये पाठवल्यास त्यांना ही पाचही पुस्तके वरीलप्रमाणे मिळू शकतील.

पैसे शक्यतो मनिऑर्डरने पाठवावेत. चेक असल्यास वटणावळ २ रुपये अधिक पाठवावी.

चेक, ड्राफ्ट, म. ऑ. राजहंस प्रकाशन या नावे पाठवावी. सोबत नाव, पत्ता संपूर्ण असावा.

योजनेची मुदत ३० सप्टेंबर १९७५ पर्यंत आहे.

## पॅपिलॉन योजनेत प्रकाशित होणारी पाच दर्जेदार पुस्तके

अंदाजे मूल्य

### पॅपिलॉन

मूळ लेखक : हेन्री शॅरियर
अनुवाद : रवींद्र गुर्जर
रुपये वीस.

### हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा

अशोक परळीकर
रुपय पंधरा.

### संचित

पाश्चिमात्य लेखकांचा वेधक परिचय
शिवाय ' मी गॉर्की बोलतोय '
सुमती देवस्थळे
रुपये वीस.

### देवाघरचा पाऊस

रवींद्र पिंगे
रुपये पंधरा.

### सिनेकलावंतांची व्यक्तिचित्रे

?

## सुमारे ७५ ते १०० रुपये किंमतीची एकूण ५ पुस्तके फक्त ३५ रुपयात.

# पॅपिलॉन पुस्तक योजना

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४३४५९

# फ्रॉम रशिया विथ् लव्ह

आश्चर्याची गोष्ट म्हणजे आज रशियात अमेरिकन लेखकांची पुस्तके मोठ्या आवडीने वाचली जातात. १९७३ साली रशियात प्रसिद्ध होणाऱ्या नियतकालिकांतून जवळजवळ २०० अमेरिकन लेखकांच्या कृती प्रसिद्ध झाल्यात. आजचा गाजणारा अमेरिकन लेखक आर्थर हेले ह्याच्या एअरपोर्ट, हॉटेल अन् फायनल डायग्नोसिस कादंबऱ्या रशियन भाषेत आल्यात. दिवसेंदिवस रशियन वाचक अमेरिकेच्या लेखकांची पुस्तके मागतो आहे. १९७१ पर्यंत घेतलेल्या आकडेवारीत ३५११ अमेरिकन पुस्तके रशियात छापली गेली. त्यांच्या प्रतींची संख्या १५०० लाखांच्या घरात होती. ड्रेझर, जॅक लंडन, ट्रूमन कपोती, जॉन चीव्हर, काल्डवेल, इर्विंग स्टोन, हेन्री जेम्स, एडवर्ड आल्बी, ओ निल, टेनिसी विलियम्स्, आर्थर मिलर, विलियम सारोयान. रॉबर्ट फ्रॉस्ट, कार्ल सँडबर्ग, ग्रेगरी कॉर्सो, लिरॉय् जोन्स, सिल्व्हिया प्लाथ ही नावे रशियन वाचकांना आता नवीन राहिली नाहीत. अमेरिकेत स्वातंत्र्याचा उद्घोष झाल्याला दोनशे वर्षे झाली आहेत. त्या निमित्ताने रशियात इंग्रजीतून एक पुस्तक 'लिटरेचर ऑफ युनायटेड स्टेट इन ट्वेंटीएथ सेंचुरी; दी सोविएट व्हयू' प्रसिद्ध करायचा मनोदय रशियाने जाहीर केलाय्.

देशोदेशीचा माणूस साहित्यातून अधिक मानवाच्या जवळ पोचतो हेच यावरून अनुमान काढू या. ¤

लिओनिड एन्जीबार्यान हा जोकर होता. लहान असतानाच तो सर्कसमध्ये भरती झाला. पुढे त्याने 'इव्हनिंग्ज ऑफ पेंटोमाईम्स' असा स्वतंत्र कार्यक्रम मंचावरून सादर करायला सुरुवात केली. तो खूप गाजला. १९७१ साली त्याने 'पेंटोमाईम व्हेरायटी थिएटर' स्थापन केले. लोकांना पोट भरून हसवायचा उद्योग मात्र त्याला फार दिवस करता आला नाही. ३७ वर्षांचं आयुष्य हसतखेळत, हसवत तो जगला. १९७२ साली तो हे जग सोडून गेला. ह्या जोकरला एक विलक्षण छंद होता. त्याच्या फुरसतीच्या वेळात तो कथा लिहायच्या. त्याचं पुस्तक मागे आहे. 'फर्स्ट राउंड' त्याचं नाव. ¤

The earth is lovely bride  
And the sun is her faithtul groom  
Summer brings them passions embrace;  
Autumn, parting's despair and gloom.

ही कविता वाचताना मला सारखं वाटत होतं कुठं हे बालकवींच्या कवितेचं भाषांतर तर नाही. विश्वसौंदर्याच्या साक्षात्कारानं बालकवी वेडे झाले. शब्द झऱ्यासारखे अपाप बाहेर यायचे......

चराचराच्या चित्ती भरले दिव्याचे गान !  
मूर्तगान हे दिव्य तयाला गाणारे कोण ?  
दिव्य गायने, दिव्य शांतता, दिव्याचे झोत  
वसुंधरेच्या अरुण ओठितो नकळत हृदयात

धरा आणि सूर्य ह्यांच्या प्रीतीचे गान आम्हाला नवीन नाही. काव्यात पुनःपुनः जन्म घेऊन पुनःपुनः नव्या नव्हाळीने प्रणय करणारी जोडी चिरंतन आहे; पण हाच भाव जेव्हा रशियन कवीनं शब्दात धरला तेव्हा क्षणभर मी स्तब्ध झालो. त्या ओळी पुनःपुनः वाचल्या. त्या आपल्याच मातीतल्या वाटाव्यात इतक्या काळजात भिडल्यात. मी तर त्याच्या कविता मित्रांनाही वाचून दाखवल्या.

त्या रशियन कवीचं नाव अर्कांडी कुलेशॉव्ह. त्याची दुसरी एक कविता अशीच खिळवून ठेवणारी आहे—' सूर्यफूले '—सूर्यासोबत फिरणारी ही फुले सायंकाळी थकली-भागली दिसतात.

So quiet and so weary does it look,  
So pleased to reach the cool of twilight's heaven—  
As if together with the Sun it took  
that giant journey all across the heavens.

¤

एक पुस्तक हाती लागलं. In the Search for Beauty. नावावरून वाटलं कथा, कादंबरी किंवा कवितांसंबंधी असेल. दुसरं मन म्हणालं, सौंदर्यशोध म्हणतात ना? मग हे सौंदर्यशास्त्रासंबंधी (एस्थेटिक्स) असेल; पण पुस्तक उघडलं अन् प्रकार वेगळाच आहे हे लक्षात आलं. मीर पब्लिकेशन—मास्कोने प्रसिद्ध केलेलं हे पुस्तक गणित आणि भूमितीच्या क्षेत्रात आजवर झालेल्या वाटचालीचा आढावा होता. त्यात युक्लिड, उमरखय्याम, लोबाचेव्हस्की आणि आईन्स्टीन इत्यादींनी गणिताच्या क्षेत्रात केलेल्या कर्तृत्वाचा उल्लेख होता. पुस्तक कुणीही हातात घेतले तर हातावेगळे करणार नाही एवढ्या चांगल्या व मिस्किल भाषेत आहे. चित्रेही आहेत खवचट—खट्याळ. उमरखय्यामसंबंधीची माहिती बऱ्याच बाबींवर नवीन प्रकाश टाकते. उमरखय्याम आम्ही ओळखतो तो कवी म्हणून. हजार वर्षांपूर्वी (निहिलिस्ट) नकाराचे तत्त्वज्ञान काव्यातून सांगणारा उमरखय्याम खरंच कोण होता? त्याचं जगाला कॉन्ट्रिब्युशन काय? त्याचा उल्लेख मॅथेमॅटिशियन, ग्रेटेस्ट इन ओरिएंटल हिस्टरी असा आहे. लेखक म्हणतो—जर उमरखय्यामने त्याच्या कवितांच्या ओळींतून वाहणाऱ्या मदिरेचा एकशंभरांश भाग ओठावर ठेवला असता आणि त्याच्या आजूबाजूला दाखविलेल्या अगणित मदिराक्षींपैकी एकदशांश जरी त्याला कुरवाळता आल्या असत्या तर त्याच्यात दुसरं काही करायला शक्तीच उरली नसती आणि त्यानं जे गणिती सिद्धान्त दिलेत ते लाख मोलाचे आहेत. क्लिष्ट आणि रुक्ष गणितासारख्या क्षेत्रात असूनही त्याचं मन कवीचं होतं की कविता त्याच्यासाठी रुक्ष विषयातून मिळालेल्या सुटकेचा श्वास (Relief) होती? पण गणित त्याच्यासाठी रुक्ष विषय तरी कुठे होता? त्यात तर तो सौंदर्य पाहात होता. ते काहीही असो. तो दोघींचा दादला होता. गणित बायको म्हणाल तर कविता रखेली.

—झिरो-झिरो-सेव्हन

# झिलमिल सितारे



## कमाल अमरोहींची खबरबात

दर दृश्याला शर्ट बदलणाऱ्या हिंदी सिनेमाच्या हीरोला लाजवील अशा वेगाने सिनेमाची कास्ट दररोज बदलण्यासाठी ख्यात असलेले कमाल अमरोही यंदा चक्क तीन कथांचे संकल्प सोडून होते. तमाम पब्लिक येत्या पंचेचाळीस वर्षांत तीन महान चित्रपट पहाण्याची तयारी करून होतं. इतक्यात–हाय ! कमालसाहेबांना, ' पाकिजा ' या न भूतो न भविष्यती दर्जाच्या चित्रपटाचे निर्माते कमालसाहेबांना कुणा पापशक्याची नजर लागली न कळे. त्याच्या नावे बोटं मोडतामोडताच ती दुःखद वार्ता आमचं काळीज आपल्या धारदार करवतीनं कापत गेली. ' आखरी मुगल ' चे निर्माते कुणी बक्षी नावाचे गृहस्थ नानाविध अडचणींनी हतोत्साहित झाले आहेत आणि तूर्तास तरी त्यांनी ' आखरी मुगल ' पडद्याआड ठेवायचा विचार केला आहे.

चित्रनिर्मात्यांमधल्या ' आखरी मुगल ' कमालसाहेबांबद्दल आम्हाला हार्दिक सहानुभूती वाटत असतानाच एकीकडे फार आनंद होतो आहे,–नाही नाही ! गैरसमज नका करून घेऊ. आनंद होतोय ना कमालसाहेबांचा एक सिनेमा थांबल्याचा नव्हे. आनंद होतोय, आता फक्त पंचवीस-तीस वर्षांत दोन महान् भव्य ( इ. इ. इ. ) सिनेमे पहायला मिळतील याचा. कमालसाहेबांसारख्या चोखंदळ दिग्दर्शकाला पंचेचाळीस वर्षं फक्त तीन चित्रपटांशी जखडणं आमच्यासारख्या जातीच्या चित्रशौकिनाला कसं रुचाव ?

' आखरी मुगल ' च्या भाटियासाहेबांचंही मत असंच असावं. ते आपलं वरवर कारण सांगताहेत की, ' अशा प्रकारचा ऐतिहासिक चित्रपट बनवायला अफाट पूंजी लागते, ती मज गरीबापाशी नसल्यामुळे मी सध्यापुरता ' आखरी मुगल ' चा विचार तहकूब केला आहे. पुढेमागे......'

काही दुष्ट लोक बोलतात की, ' कमालसाहेबांची कामाची रीत पाहून भाटियांनी विचार बदलला; ' पण तिकडे दुर्लक्ष करावं हे उत्तम. आता त्यांनी एक सोशल पिक्चर हाती घेतलं आहे आणि त्याचं दिग्दर्शन त्यांनी प्रमोद चक्रवर्तीकडे सोपवलं आहे.

आता नवी खबर अशी की, एके काळी गाजलेला ' पुकार ' पुन्हा निघतो आहे. जुन्या ' पुकार ' चं श्रेय कमालसाहेबांच्या संवादाकडे मोठ्या प्रमाणात जातं. तेव्हा नव्या ' पुकार ' साठी त्यांना मानाचं बोलावण असावं हे उघड आहे.

पुकार ' मध्ये आता सोहराब मोदींच्या जोडीला दिलीपकुमार येईल असा अंदाज आहे आणि फक्त दिलीप का ? राजकपूर, धर्मेन्द्र, हेमामालिनी, रेखा, प्राण आणि महमूद–अशी रत्नखचित श्रेयनामावली जमवायचा मोदीसाहेबांचा विचार आहे. अँड ऑफ कोर्स अबव्ह ऑल सोहराब मोदी आहेतच.

' पुकार ' च्या जोडीनंच आपल्या महत्त्वाकांक्षी ' रजिया सुलताना ' ला कमालसाहेब मार्गी लावणार आहेत. ' अल्लामियांची मेहेरबानी असेल तर ऑगस्टअखेर या चित्राचं काम सुरू करायचं ', असा त्यांचा मानस आहे.

कमालसाहेबांच्या धीम्या ( सुस्त म्हणत नाही हं ! प्लीज नोट ! ) गतीनं या कथेची प्रगती कशी काय होणार, असा सवाल टाकून कमालसाहेबांना दुखवू नका हं. ते चिडून उत्तरतात, ' सिनेमा काढणं हा माझा शौक आहे. तो काही माझा पोट जाळायचा धंदा नाही. मी तब्येतीनं काम करण्यावर विश्वास ठेवणारा आहे. पैशाचाच हव्यास असता, तर मी ' पाकीजा ' नंतर लगेच दोन-चार पिक्चर्स काढून नसती का टाकली ? पण मला चांगली फिल्मच बनवायची होती. म्हणून ' रजिया सुलतान ' ची कथा मुक्रर करून मी थांबलो. धर्मेन्द्र आणि हेमामालिनी या नावांवर नव्हे, तर त्यांना मी ' साइन ' करण्याआधीच माझा सिनेमा विकला गेला–माझ्या एकट्याच्या नावावर ! '

मुबारक हो, कमालसाहेब, मुबारक. यंदा तुम्ही ' आधी केले मग सांगितले ' चा बाणा अनुसरलायस ( चक्क ) दिसतंय. परवाच्याच ' स्क्रीन ' मध्ये ' रझिया सुलतान ' च्या सेटवर तुम्ही धर्मेन्द्रसह उभे असल्याचं दृश्य पाहून आमच्या नेत्रकमलांचं पारणं फिटलं. याच धर्मेन्द्रला एके काळी ' पाकीजा ' तून तुम्ही शिताफीनं–नव्हे, ओबडधोबडपणानंच–कटवल्याचं आम्हाला आठवलं. ' कालाय तस्मै नमः, बॉक्स ऑफिसाय तस्मै नमः ' अशा नाटकी सुस्कारा टाकायला आम्ही मोकळे झालो. बॉक्स ऑफिस, मार्केट व्हॅल्यू हीच अखेरशेवटी सिनेमातल्या माणसांच्या जुन्या दुखण्यांवर उताऱ्याची औषधं असतात तर ! असो असो. कमालसाहेब, एनी वे, आम्ही तुमच्या ' रजिया सुलतान ' ची औत्सुक्यानं वाट पाहू. ■■

# ' बैराग धूम माजवील ! '

## –इति पं. प्रेम चोप्रा

प्रेम चोप्रा याची एवढी चलती का, याचं रहस्य आमच्या परवापरवा ध्यानात आलं. चेहऱ्याला रंगाऐवजी तूप फासून काम करतोय असा वाटणारा ओशट चेहऱ्याचा हा व्हिलन म्हणे उत्तम भविष्यवेत्ता आहे. तो ज्या सिनेमांबद्दल छातीठोकपणे बोलतो, ते सिनेमे हमखास जुबिली करतात, असा आजवरचा शंभर नवे पैसे अनुभव आहे. ज्योतिर्भूषण, होरारत्न (फिल्मी) पंडित प्रेमजींचा ग्रहाशीर्वाद लाभलेला ताजा भाग्यवान चित्रपट आहे–बैराग !

होय होय ! तोच ' बैराग ' –ज्यानं निर्माते मुशीर रियाजच्या तोंडचं पाणी पळवून टाकलं आहे. तोच ' बैराग ' की ज्याची वाट पहाता पहाता दिलीपभक्तांचे केस पांढरे होऊ लागले आहेत. तोच बैराग–की ज्याच्या सेटवर असित सेनबाबूंना दिग्दर्शनाऐवजी, आयुष्यभर पुरतील इतकी पानं खायची संधी मिळाली. तोच ' बैराग ' की ज्या– इत्यादी इत्यादी. असो.

' बैराग 'बद्दलच्या चित्रवर्तुळात तऱ्हेतऱ्हेच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या जात आहेत. प्रेमनाथ म्हणतो, ' गेली कित्येक वर्षं मी ' बैराग येणार–येणार 'च्या घोषणा ऐकतो आहे. करुणानिधी प्रभुचरणी माझी प्रार्थना आहे, त्यानं मला शंभर वर्षांचं आयुष्य द्यावं, जेणेकरून हा सिनेमा माझ्या नजरेस पडू शकेल ! '

' धर्मात्मा 'कार फीरोज खान म्हणतो, ' ' बैराग 'चं शूटिंग नियमित सुरू होतं, त्याच सुमारास मी माझ्या पहिल्या चित्रपटाचा– ' अपराध 'चा मुहूर्त केला ! त्यानंतर मी दुसरा सिनेमा–(' धर्मात्मा ') देखील पूर्ण केला; पण अद्याप ' बैराग 'चा पत्ता नाही !

लीना चंदावरकर : ' ' बैराग 'मधे दर वेळी मला शूटिंगसाठी बोलावण्यात येतं तेव्हा, फक्त पाच दिवसांचं काम राहिलंय म्हणून सांगण्यात येतं. गेली अडीच वर्षं मी नेमानं ' फक्त पाच दिवसां 'चं काम करत्येय ! "

खुद्द पंडितजी प्रेम चोप्रांचा अनुभव काय आहे ? ते कास्टमधे सामील होण्याच्या आधी ' बैराग ' दोन वर्षं सेटवर होता. त्यांचं स्वतःचं ' बैराग 'मधलं काम आता दोन वर्षांचं होत आलं आहे !

तर असा हा ' बैराग ' १९७५ साली प्रदर्शित करायचाच, असा दृढनिश्चय मुशीर-रियाजत जोडीनं केला आहे. कार्य सिद्धीस नेणे अर्थातच दिलीपमहाराजांच्या हाती !

**लिहिता लिहिता :** ' बैराग ' या ऑक्टोबरमधे नक्की नक्की रीलिज होईल, असं भविष्य वर्तवायला हरकत नाही. जाहिराती झळकताहेत, रेडिओ प्रोग्रॅम्स होऊ लागलेत. तेव्हा...बा ऽ अद ऽ ब, बा मुला ऽ ऽ हिजा ऽ, बा ऽ ऽ ऽ होशियार ऽ ऽ ऽ !

■ ■



दिलकी राहे 'नेहमी तुफानावाल्यांची असणार याचा अनुभव इशाराबाबू, रेहाना सुलतान आणि राकेश पांडे यांनी पडद्यामागेदेखील घेतला.

तावून सुलाखून निघालेलं हे चित्र आता प्रदर्शनाच्या वाटेवर आहे.

## अवचित उलगडलेले कोडे

अद्ययावत कपड्यांत सजलेला, रुबाबदार मिशी ओठावर वागवणारा तो गोरागोमटा तरुण प्रत्येक इंग्रजी सिनेमाला आम्हाला भेटायचा. ‘ हा कोण ’ या कुतूहलानं प्रत्येक वेळी हा आमचं सिनेमातलं अर्धं लक्ष काढून घ्यायचा.

त्याची सिनेमा बघण्याची पद्धतही न्यारी होती. देहभान विसरून, प्रसंगांशी आणि पात्रांशी समरस होत तो त्या त्या सिनेमाचा होऊन जाई.

‘ द सीक्रेट ऑफ सान्ता व्हित्तोरिया ’मधला अँन्थनी क्वीनचा उंच टाकीवरचा प्रणय-समरप्रसंग पहाताना तो अगदी रंगून गेला होता.

‘ हंड्रेड रायफल्स ’ आणि ‘ प्रोफेशनल्स ’— मधल्या आगगाड्यांवरच्या चकमकींमधे त्यानं स्वतःला हरवून टाकलं.

‘ वन्स अपॉन अ टाइम इन द वेस्ट ’मधे नायकानं शेळ्यामेंढ्यांच्या कळपात घुसून स्वतःचा केलेला अभिनव बचाव त्याला पसंत पडल्याचं स्पष्ट जाणवलं होतं.

‘ द गुड, द बॅड अँड द अग्ली ’मधली व्हिलनची एंट्री आणि त्याला संगीतानं दिलेली साथ यांवर तो बेहद्द खूष झाला होता.

दर वेळी, आमच्या पुढच्या रांगेत बसून, तनमनधन वेचून सिनेमावर प्रेम करणारा हा कोण, या कूट प्रश्नाचं उत्तर आम्हाला परवा सापडलं.

परवा तसा तो आमच्यापुढे बसलेला नव्हता. पण सिनेमाच्या श्रेयनामावलीत त्याचं नाव अग्रभागी झळकत होतं आणि आमच्याबरोबर दर खेपी पाहिलेल्या चित्रपटांचा त्यानं किती मन लावून अभ्यास केला होता याची देखणी आणि रंजक साक्ष साऱ्या चित्रपटभर दिसत होती.

त्या रुबाबदार तरुणाचं नाव—रमेश सिप्पी. त्या एरवी रंजक आणि नेत्रसुखद, पण प्रदीर्घ लांबीमुळे मधेच फार कंटाळा आणणाऱ्या चित्रपटाचं नाव— ‘ शोले ! ’ ■ ■



## इटस् दॅट गॅम्बलिंग !

आवाजामधे पुरी ताकद असलेला नट म्हणून अमिताभ बच्चन आज विशेष प्रशंसिला जातो आहे; पण आवाजाच्या या ताकदीचा उपयोग पडद्यामागे गाण्यासाठी करणे हा एक जुगारच नव्हे का ?

तसं तर 'अभिमान'मधे अमिताभनं पॉप सिंगर चांगला उभा केला; पण त्याला उसना आवाज होता किशोरकुमारचाच. अर्थात ही उसनी मदत घेऊनही पॉप सिंगरचा साज अमिताभला त्याच्या स्किन फिट् शर्टाइतकाच फिट् बसला.

कदाचित या कल्पनेमुळेच असेल, 'द ग्रेट गॅम्बलर'च्या निर्मात्यांनी (श्री. सी. व्ही. के. शास्त्री–बी. आर. चोप्रांचे माजी प्रॉडक्शन कंट्रोलर, 'जोरूका गुलाम' व 'नया नशा' या चित्रांचे निर्माते) अमिताभला गायला लावायचा विचार केला. तर आशा भोसलेबरोबर परवापरवा अमिताभनं एक 'ड्युएट' चक्क ध्वनिमुद्रित केलं. त्यांच्या जोडीला असली पॉप सिंगर जॉली तथा माजी नट शरदकुमार यानंही भाग घेतला. आशा–अमिताभ–जॉली हा स्वरमिलाफ घडवला 'पंचम' आर. डी. बर्मन यांनी.

कोणताही जुगार ही नशिबाशी लढाई असते, तेव्हा त्या अर्थी हीरोला गायला लावण्याचा हा जुगार समजून घ्यावा.

अमिताभ--झीनत जोडीचा 'ग्रेट गॅम्बलर' देशीविदेशी जुगारखान्यांची रंगीन सैर घडवून आणेल. त्यासाठी रोम आणि लिस्बन येथे खास चित्रण झालं म्हणे.

दरम्यान 'ग्रेट गॅम्बलर'ची पब्लिसिटी अत्यंत चोखपणे सांभाळली जात आहे. अमिताभ–झीनतच्या रोमान्सच्या वावड्या उठवल्या जात आहेत आणि देव आनंद आणि जया भादुरी–बच्चन यांच्याबद्दल सहानुभूती व्यक्त करणं, अमिताभ–झीनत यांच्या नवनव्या भेटीगाठींची सुरस वर्णनं इ. इ. (वाचा : ताजे 'स्टार अँड स्टाइल' व 'स्टार डस्ट.' ■■



और एक फॅमिली साइज़ तसवीर !
'चैताली' धर्मेन्द्र-सायरा जोडीवरचा
अपयशी शिक्का पुसेल काय ?